---

# * प्र क र ण – 5 वे *

---

## 'हुंदके आणि 'समाधीवरील अश्रू' या संग्रहांखेरीज अन्य ग्रंथांमधील मृत्युलेखांचे स्वरुप आणि वैशिष्टये :

'हुंदके' व 'समाधीवरील अश्रू' या संग्रहांखेरीज 'आषाढस्य प्रथम दिवसे' या संग्रहात स्मृतिलेखांचा व 'दलितांचे बाबा', 'सूर्यास्त' व 'इतका लहान एवढा महान' या ग्रंथांमध्ये काही मृत्युलेखांचा समावेश आहे. या प्रकरणामध्ये वरील संग्रहांमधील मृत्युलेखांचे स्वरुप, त्यात दिसून येणारे अत्र्यांच्या मृत्युलेखलेखनाचे विशेष, शैली, वैशिष्टये, ' हुंदके' आणि 'समाधीवरील अश्रू' या मृत्युलेखसंग्रहामधील मृत्युलेखांच्या तुलनेत या ग्रंथांमधील मृत्युलेखांचा विचार करावयाचा आहे.

अत्र्यांनी अगदी लहानपणापासून पाहिलेली काही माणसे ज्यावेळी निवर्तली त्यावेळी ते वयाने लहान असल्यामुळे त्या व्यक्तींवर त्यांना त्यावेळी जे लिहिता आले नाही ते प्रौढपणी त्या त्या व्यक्तींच्या स्मृतिदिनांच्या निमित्ताने स्मृतिलेख लिहून त्या व्यक्तींविषयीचे आपल्या मनातील प्रेम, आस्था, जिव्हाळा, सहानुभूती, श्रध्दा अत्र्यांनी व्यक्त केली आहे. अशा स्मृतिलेखांचा समावेश 'आषाढस्य प्रथम दिवसे' या संग्रहात करण्यात आला आहे. या संग्रहात एकही मृत्युलेख नसून विविध प्रसंगांचे औचित्य सांभाळण्यासाठी लिहिलेले हे अग्रलेख आहेत. त्यातील जे अग्रलेख व्यक्तींसंबंधी आहेत त्यांचे स्वरुप स्मृतिलेखांचेचे आहे. मृत्युलेख आणि स्मृतिलेख हे दोन्ही वाङ्मयप्रकार जरी एकमेकांच्या निकटचे असले तरीदेखील मृत्युलेख ह्या वाङ्मयप्रकाराचे स्वरुप स्मृतिलेखांहून वेगळे असल्याने साहजिकच ह्या लेखांचे स्वरुप मृत्युलेखांहून निराळे आहे. त्यामुळे या लेखांचा विचार मृत्युलेख म्हणून करता येत नाही. तरीदेखील मृत्युलेखांमध्ये येणारी व्यक्तीविषयक चिंतनशीलता, जिव्हाळा, आत्मीयता, भावपूर्णता, काव्यमयता, उत्कटता, भव्यता, उदात्तता यांचे दर्शन या स्मृतिलेखांमध्ये घडते. मृत्युलेख लेखनात येणारे सळसळते कारुण्य व हळवेपण स्मृतिलेखात विशेषतः येत नाही. कारण मृत्युलेख जसा तत्कालीन भावनातिरेकातून लिहिला जातो तसे स्मृतिलेखाचे नसते.

या ग्रंथात समाविष्ट झालेल्या लेखांचे स्वरुप हे स्मृतिपर असल्यामुळे वेगवेगळया प्रसंगी स्मृतिदिनांच्या निमित्ताने त्या त्या व्यक्तींविषयी हे लेखन झाले आहे. मृत्युलेखांचे लेखन जसे घाईगर्दीत करावे लागले तसे या लेखनाचे नाही. स्मृतिदिनांच्या निमित्ताने हे लेखन झाल्याने त्यासाठी आवश्यक असणारा काहीसा निवांतपणा येथे मिळाल्यामुळे हे लेखन प्रगल्भ, व सर्वस्पर्शी झालेले दिसते. या लेखनातून अत्र्यांचा स्मृतिलेख नायकाच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी प्रगल्भ दृष्टिकोन व्यक्त झाला असून त्या त्या व्यक्तींच्या कार्याचे यथोचित मूल्यमापन ते करतात. तसेच ऐतिहासिक क्षेत्रातील व्यक्तींवरील व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींवरील लेखांमधून त्यांचा इतिहासाकडे व राजकीयतेकडे पाहण्याचा डोळस व रास्त दृष्टिकोन व्यक्त होतो. बव्हंशी लेखन पुण्यस्मरणांच्या निमित्तानेच झाले असल्याने अत्र्यांच्या मृत्युलेखांत येणारे दोषांचे दिग्दर्शन स्मृतिपर लेखांमधून फारसे येत नाही. तसेच त्यांच्या मनातील प्रखर राष्ट्रभक्ती, साधूसंतांबद्दलचा भाबडा दृष्टिकोन स्पष्ट होतो. या लेखनाच्या अनुषंगाने अत्र्यांच्या परंपरापूजकतेचेही प्रत्यंतर येते. या पार्श्वभूमीवर " आषाढस्य प्रथम दिवसे " मधील अनेक ललित गद्यात, सामर्थ्य, साधुत्व आणि सौंदर्य यांचा साक्षात्कार घडतो. विषय लहान – मोठा, महान क्षुद्र कसाही असो त्यातून या ललितगुणांची प्रचिती येते."[1] हे डॉ. एस. एस. भोसले यांचे मत अगदी रास्त आहे.

**'दलितांचे बाबा' मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील स्मृतिलेखांचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये –**

आचार्य अत्रे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर वेळोवेळी जे लेख लिहिले ते 'दलितांचे बाबा' या पुस्तकात संग्रहीत केले आहेत. पैकी 'दलितांचे बाबा गेले', ' महानिर्वाण', 'असे प्रेम नि असा शोक', 'भारताचा उद्धारकर्ता महात्मा' हे आंबेडकरांवरील मृत्युलेख आहेत. हे लेख चरित्रवजा असून त्याद्वारे आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व, कार्य यांची मालिकाच अत्रे उलगडत नेतात.

तसे पाहिले तर आचार्य अत्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे टीकाकार होते परंतु घटना समितीमध्ये डॉ. आंबेडकरांनी अखंड भारताच्या पुरस्काराची जी तेजस्वी घोषणा केली त्यावेळी त्यांच्या प्रखर देशभक्तीचे सर्व भारत देशाला दर्शन झाले. तेव्हापासून त्यांच्या चरित्राबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल अत्र्यांना विलक्षण आदर वाटू लागला.

'दलितांचे बाबा गेले' या आंबेडकरांवरील मृत्युलेखात अत्र्यांनी आंबेडकरांच्या महान कार्याचा परिचय करुन दिला आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर भारतातील सात कोटी अस्पृश्य जनता पोरकी झाली. अखिल भारतातील दीनदुबळयांचा आधार बाबांच्या निधनाने तुटून पडला. बाबासाहेब जुलमी,

ढोंगी विषमतेविरुद्ध आयुष्यभर प्राणपणाने झगडत राहिले. सामाजिक न्यायासाठी, माणुसकीच्या हक्कासाठी त्यांनी संघर्ष केला. हे कार्य करताना सवर्ण हिंदू समाजाने आणि सत्ताधारी काँग्रेसने आंबेडकरांची निंदा केली. छळ केला. अपमानास्पद वागणूक दिली. परंतु त्या छळाची, विटंबनेची त्यांनी पर्वा केली नाही. धर्माच्या आणि सत्तेच्या जुलुमाला ते शरण गेले नाहीत. त्यांना नेहमी वाटायचे की, चातुर्वर्ण्याने हिंदू धर्माचा आणि हिंदुस्थानचा नाश केला आहे. म्हणून चातुर्वर्ण्यावर आधारित अस्पृश्यता नेस्तनाबूत करण्यासाठी आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाविरुद्ध बंड पुकारले. परंतु सवर्ण समाजाच्या मानसिकतेत कोणताही बदल होत नसल्याचे बघून त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. याच संदर्भात अत्रे म्हणतात, "राज्यकर्त्यांनी बहिष्कारीले, हिंदु समाजाने लाथाडले, तेंव्हा अखेर स्वतःचा आणि आपल्या सात कोटी असाहाय्य नि हीनदीन अनुयायांचा उद्धार करण्यासाठी त्यांना मानव जातीला समतेचा, दयेचा आणि शान्तीचा संदेश देणा-या त्यावरम कारुणिक बुद्धाला शरण जाण्यावाचून गत्यंतरच उरले नाही."[2] म्हणूनच ता. 14 ऑक्टो 1956 रोजी नागपूर येथे पाच लाख अस्पृश्यांना त्यांनी बुद्ध धर्माची दीक्षा दिली आणि सा-या भारताला मी बौद्ध करीन अशी गगनभेदी गर्जना केली. परंतु अल्पावधीतच दि. 6 डिसें. 1956 रोजी त्यांचे निधन झाल्याने त्यांचे हे कार्य अपुरे राहिले.

या लेखातून अत्र्यांनी डॉ. आंबेडकरांच्या दलितोद्धाराच्या आणि सामाजिक क्रांतिकार्याचा आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय विचारांचा परामर्श घेऊन त्यांच्या महान कार्याचा गौरव केला आहे.

या अनुषंगाने आंबेडकरांवर लिहिलेल्या इतर मृत्युलेखांमधून आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वातील निरनिराळया पैलूंचे दर्शन घडवले आहे. 'महानिर्वाण' या लेखात अत्र्यांच्या लेखणीतून करुणरम्य सुभाषितांची स्वाभाविक निर्मिती झाली आहे. "महापुरुषांचा अवतार जेंव्हा समाप्त होतो तेंव्हा इतिहासाचे एक पर्व पूर्ण होते. सामान्य माणसे वाटेल तेंव्हा मरतात. पण असामान्य पुरुषांचे जीवन जसे लोकोत्तर तसे त्यांचे मरणही लोकोत्तर !"[3] अशा सुभाषितांमधून अत्रे बाबासाहेबांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. तसेच तात्कालीन सत्ताधीशांनी आंबेडकरांबद्दल केलेल्या दुजाभावाबद्दलचा निषेधही ते व्यक्त करतात आणि मृत्यूनंतरही आंबेडकरांवर प्रस्थापित राजकारण्यांनी कसा सूड उगवला ते सप्रमाण सांगतात.

'असे प्रेम नि असा शोक' या लेखात लो. टिळक, म. गांधी अशा ऐतिहासिक पुरुषांच्या मृत्यूप्रसंगांशी आंबेडकरांच्या मृत्यूप्रसंगाची तुलना करुन जनतेच्या अपरंपार शोकाचे आणि पर्यायाने

आंबेडकरांवरील प्रेमाचे प्रत्यंतर व्यक्त झाले आहे. आंबेडकर जीवनात अतिशय स्वाभिमानी आणि धैर्यशील असल्यामुळे त्यांना कोणाचेही भय वाटत नसे. 'निखा-यावर भाजलेली मुले' या आंबेडकरांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या लेखात त्यांच्या 55 व्या वाढदिवसानिमित्त अत्र्यांनी त्यांना मागितलेला संदेश आणि आंबेडकरांनी दिलेला संदेश या अनुषंगानेच हा लेख लिहिला असल्याने आंबेडकरांचे लोकशाही विषयीचे परखड विचार व्यक्त झाले आहेत. तसेच आंबेडकरांचे लोकशाही विषयीचे परखड विचार व्यक्त झाले आहेत. तसेच आंबेडकरांनी दलित समाजाचे केलेले सिंहावलोकन व आत्मपरीक्षणही स्पष्ट होते. 'दयेची भीक नको' या लेखात संत वाड्.मयाची चिकित्सा करुन संतांनीही दलितांना हीनच ठरवले असा निष्कर्ष अत्रे काढतात. व त्या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांचे दलितोद्धाराबद्दलचे रास्त विचार स्पष्ट करतात. त्यामुळे या दोन अग्रलेखांचीही जाताजाता दखल घेणे इष्ट ठरते.

'भारताचा उद्धारकर्ता महात्मा।' या मृत्युलेखामधून भारतीय राजकारण आणि समाजकारण यात बाबासाहेबांचे योगदान किती महत्त्वपूर्ण होते यासंबंधी अत्र्यांनी स्पष्टवक्तेपणे भाष्य केले आहे. बाबासाहेब हे भारतीय राजकारण व समाजकारणातील वादळी व्यक्तिमत्त्व. या वादळाने स्वतःचा विचार कधीच केला नाही. त्यांनी आपले सारे आयुष्य आपल्या बांधवांच्या उद्धारासाठी कारणी लावले आणि आपली सारी हयात हक्कांसाठी स्वकीयांशी लढण्यातच घालवावी लागली. अस्पृश्यता निवारणाबाबत त्यांना खुद्द गांधीजींशीही मोठी लढाई लढावी लागली. अस्पृश्यता कायद्याने गेली पाहिजे आणि अस्पृश्यांना कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. असा आंबेडकरांचा आग्रह होता. तर म. गांधींचे म्हणणे होते की, समाजाचे हृदयपरिवर्तन होऊन अस्पृश्यता नष्ट व्हायला हवी. पण हे सहजासहजी होणार नाही याची बाबासाहेबांना पूर्ण कल्पना असल्याने गांधींचा समाजाच्या हृदयपरिवर्तनाचा विचार त्यांना पटला नाही. यासाठी त्यांना गांधींशी संघर्ष करावा लागला. तसेच आंबेडकरांनी घडवून आणलेले धर्मांतर हे केवळ वैफल्यातून त्यांनी घडवले नाही तर त्यामागेही त्यांची धर्मनिष्ठाच दिसून येते. ते हिंदूंचे द्वेष्टे नसून द्रष्टे होते हे अत्र्यांनी तपशिलवार सांगितले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विद्वत्ता, ऐहिकता, आध्यात्मिकता, धर्मनिष्ठा, देशनिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद, मानवतेबद्दलची पूजनीयता याचे दर्शन घडते. तरीदेखील हा महापुरुष भारतीय राजकारणात उपेक्षितच राहिला याबद्दलची खंतही अत्रे जागोजागी व्यक्त करतात. बाबासाहेबांवरील इतर लेखांच्या तुलनेत या लेखातून अत्र्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व राजकीय, सामाजिक, धार्मिक कार्याचे मार्मिक दर्शन घडवले आहे.

ह्या चार मृत्युलेखांमधून अत्र्यांनी आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे व त्यांच्या कार्याचे दर्शन घडवले आहे. ह्या लेखसंग्रहात एकूण 26 लेखांचा समावेश आहे. मात्र ते निरनिराळया प्रसंगी

लिहिलेले वैचारिक लेख आहेत. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर सलग 14 दिवस लिहिलेल्या अग्रलेखांपैकी वर विचार केलेले चार अग्रलेखच मृत्युलेख आहेत. इतर अग्रलेखांमधून बाबासाहेबांचे वैचारिक व सामाजिक कार्य यांचे दर्शन घडवताना ब-याच लेखांमध्ये पुनरावृत्तीचा दोष येतो. याचे कारण म्हणजे "अग्रलेख म्हणून लिहिलेले लेख चरित्रलेखनात्मक पुस्तकात ग्रथित करताना संस्काराची आवश्यकता होती. ते घडलेले नाही. मात्र चारित्रलेखनातून घडणारे व्यक्तिमत्त्वाचे प्रत्ययकारी दर्शन किंचित निसटत असले तरी फार डागाळते असे नाही."[4] ही गोष्ट मृत्युलेखांबाबतही होते. आंबेडकरांचे विद्वत्तापूर्ण, समाजवादी व्यक्तिमत्त्व, त्यांना अस्पृश्यांच्या उद्धाराची असणारी तळमळ व त्यादृष्टीने आयुष्यभर त्यांनी केलेले कार्य, त्यांचे सामाजिक व राजकीय विचार यावर अत्र्यांनी आंबेडकरांवरील मृत्युलेखांमध्ये भाष्य करुन त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील स्वातंत्र्य, समता वलोकशाही मूल्यांचे दर्शन समर्पकतेने घडवले आहे. इतर लेख त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाच्या व सामाजिक कार्याच्या एकेका अंगाचे दर्शन घडविण्यासाठी लिहिले आहेत. मात्र त्यांना मृत्युलेख म्हणता येणार नाही.

*** 'सूर्यास्त' मधील पंडित जवाहरलाल नेहरुंवरील मृत्युलेखांचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये –**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मृत्यूनंतर अत्र्यांनी 'मराठा' या दैनिकातून त्यांच्यावर लिहिलेल्या सतरा मृत्युलेखांचा समावेश 'सूर्यास्त' या संग्रहात आहे. ह्या सतरा मृत्युलेखांमधून पंडित नेहरुंच्या व्यक्तिमत्त्वाच्या व कार्याच्या विविध पैलूंचे दर्शन अत्रे घडवतात. यात प्रामुख्याने नेहरुंच्या राजकीय कार्याच्या व कौटुंबिक पार्श्वभूमीवरील व्यक्तिमत्त्वाच्या अनुषंगाने लेखन झाले आहे. तसेच त्यांचे वैचारिक व्यक्तिमत्त्व, जीवनविषयक विचार, चिंतन यांचेही चित्रण काही मृत्युलेखांमधून घडते.

*** नेहरुंच्या राजकीय कार्याच्या अनुषंगाने खालील पैलूंचे दर्शन घडते.**

1. स्वातंत्र्यचळवळीतील महत्त्वपूर्ण योगदान'.
2. 'राजकीय विचारधारा व कर्तृत्व'
3. 'नेहरुवादाचे 'स्वरुप'
4. 'नेहरुंचे आर्थिक विचार'

*** नेहरुंच्या स्वभावविशेषांच्या व कौटुंबिक पार्श्वभूमीवरील व्यक्तिमत्त्वाच्या अनुषंगाने खालील पैलूंचे दर्शन घडते.**

1. 'नेहरुंचे प्रेमजीवन व वैवाहिक जीवन'

2. 'व्यासंगी व रसिक व्यक्तिमत्त्व'

3. 'मुलांचे चाचा नेहरु' (नेहरुंना असणारे मुलांबद्दलचे प्रेम')

4. 'नेहरुंचे वक्तृत्त्व'

5. पत्रांमधून व्यक्त होणारे नेहरुंचे जीवनविषयक विचार (पत्रलेखक नेहरु)

6. 'नेहरुंचे मृत्यूविषयक विचार' (काव्यमय दृष्टिकोन)

7. 'नेहरुंच्या अंत्यविधीवरील 'अग्नेयं स्वाहा' हा करुणरम्य मृत्युलेख.

'सूर्यास्त' मधील 'स्वातंत्र्यसूर्य मावळला', 'अग्नेयस्वाहा', 'अश्रू आणि फुले', 'लोकप्रिय नेहरु', 'भारताचे ऋतुराज', 'नेहरु आणि गांधीजी', ' नेहरु आणि पंचशील', 'नेहरुवाद', 'विरोधकांना भुलवणारे नेहरु', ' रसिकराज नेहरु', 'चाचा नेहरु', 'नेहरुंचे अंतरंग', 'नेहरु आणि गुलाब', 'ऋतुसंहार', 'अखेरचा प्रणिपात', 'अनंताची हाक', 'अखेरची इच्छा' या सतरा मृत्युलेखांमधून नेहरुंच्या व्यक्तिमत्त्वातील वरील विविध पैलूंचे दर्शन घडते. या पैलूंच्या अनुषंगाने नेहरुंच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन खालील प्रमाणे घडते.

*** नेहरुंच्या राजकीय कार्याच्या अनुषंगाने चित्रण –**

1. 'स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदान –

'स्वातंत्र्यसूर्य मावळला' या सूर्यास्तमधील पहिल्याच मृत्युलेखामधून नेहरुंच्या स्वातंत्र्यचळवळीतील महत्त्वपूर्ण योगदानाचे अत्र्यांनी विवेचन केले आहे. नेहरुंचा अंत हा नेहरु या व्यक्तीचा अंत नसून नेहरुयुगाचा अंत आहे असे अत्र्यांना वाटते. नेहरु हे गांधीजींचे निष्ठावंत शिष्य असले तरीदेखील त्यांची म्हणून एक राजकीय विचारसरणी होती. गांधीजींच्या मवाळ धोरणांमुळे ब-याच वेळा नेहरु व गांधींमध्ये खटके उडत असत. गांधीजी हे मवाळ विचारांचे आणि नेहरु हे गांधींचे अनुयायी असले तरी ते मात्र वेळोवेळी क्रांतिकारी भूमिकाच घेत असत. भारतीय स्वातंत्र्य लढयात अन्य देशांमधल्या जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठी नेहरुंनीच प्रयत्न केले. अत्रे नेहरुंच्या युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असताना त्यांच्या राजकारणानुसार टीकाही करतात. मात्र तरीदेखील त्यांच्या स्वातंत्र्यचळवळीतील महत्त्वपूर्ण योगदानाच्या अंगाने नेहरुंचे श्रेष्ठत्व ते मान्य करतात.

2. 'नेहरुंची राजकीय विचारधारा व कर्तृत्व '–

'अश्रू आणि फुले',' लोकप्रिय नेहरु','भारताचे ऋतुराज', 'नेहरु आणि गांधीजी',

'नेहरु आणि पंचशील', 'विरोधकांना भुलविणारे नेहरु', या लेखांमधून प्रामुख्याने नेहरुंची राजकीय विचारधारा आणि कर्तृत्त्व यावर अत्र्यांनी भाष्य केले आहे.

'अश्रू आणि फुले' या लेखात अत्रे नेहरुंच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. नेहरुंनी जागतिक राजकारणात शांतता आणि प्रगतीसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांची ख्याती 'शांतीदूत' म्हणून जगभर पसरली. स्वातंत्र्यचळवळीतील खंदा लढवय्या, जागतिक पातळीवरील शांतीदूत, म्हणून भारत आणि भारताबाहेरील जनसामान्यांना नेहरु आधारस्तंभ वाटत असत. त्यांनी भारताला स्वातंत्र्य तर मिळवून दिलेच पण त्याचबरोबरीने भारत आणि भारताबाहेर युद्ध होऊ नये यासाठी वैचारिक युद्ध त्यांनी आयुष्यभर केले. लोकशाही मूल्यांची जोपासना, बुद्धी आणि भावना यांचे तारतम्य, शांतताप्रियता, संस्कारक्षमता, भावनेची कोमलता आणि बुद्धीचे औदार्य या सर्व बाबींचा समन्वय त्यांच्या राजकारणात झाल्याने अत्रे नेहरुंची गणती जागतिक पातळीवरील मूठभर माणसांमध्ये करतात. 'लोकप्रिय नेहरु' या लेखात नेहरुंच्या लोकप्रियतेवर भाष्य करीत असताना त्यांच्या राजकीय कर्तृत्त्वावरही ते प्रकाश टाकतात. किंबहुना नेहरुंचे स्वातंत्र्यचळवळीत 1916 मध्येच पाऊल पडले आणि 15 एप्रिल 1919 रोजी इंग्रजांनी जालियनवाला बागेत केलेल्या कत्तलीचा निषेध नोंदविण्यासाठी नेहरुंनी जी जळजळीत भाषणे केली तेंव्हापासून ते जनसामान्यांच्या हृदयसिंहासनावर आरुढ झाले. मात्र त्यांना राष्ट्रव्यापी लोकप्रियता लाभली ती 1920 – 21 साली गांधीजींनी केलेल्या सत्याग्रहात सहभागी झाल्यामुळे. पिढीजात ऐश्वर्याचा त्याग करुन त्यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी आपले सर्वस्व पणाला लावले. वेळोवेळी तुरुंगवास पत्करला त्यामुळेच त्यांना कमालीची लोकप्रियता लाभली.

'भारताचे ऋतुराज' या लेखामधून त्यांच्या राजकारणातील उदारमतवाद, मानवतावाद व समतावादावर भाष्य करताना त्यांच्या स्वातंत्र्य प्रेमाचे व ध्येयवादाचे अनेक दाखले ते देतात. तसेच भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने दूरगामी दृष्टिकोनातून त्यांनी राष्ट्रविकासासाठी तीन पंचवार्षिक योजना आखल्या. त्यामागील त्यांची दूरदृष्टी, ध्येयवाद व आशावाद स्पष्ट होतो. 'नेहरु आणि गांधी' या लेखात अत्रे गांधी व नेहरु यांच्या व्यक्तिमत्त्वातील व स्वभावातील विरोधाभासाचे मूल्यमापन करतात. नेहरुंनी गांधीची विचासरणी जरी स्वीकारली होती तरी गांधीवादी तत्वज्ञान त्यांच्या बुद्धीला पटले मात्र नव्हते. गांधींच्या राजकारणातील अहिंसा, अध्यात्म, गूढवाद, धार्मिक मंत्रतंत्राचे प्रस्थ नेहरुंना पटत नसे. ते ईश्वराचे अस्तित्त्व न मानणारे व बुद्धिवादावर भर देणारे राजकारण करावे या मताचे होते आणि आयुष्यभर त्यांनी याच न्यायाने राजकारण केले.

जागतिक शांततेसाठी नेहरुंनी ज्या पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला त्यावर 'नेहरु आणि पंचशील' या लेखात त्यांच्या अलिप्ततावादाचे व शांततावादी कार्याचे मूल्यमापन अत्रे करतात. 'सर्व राष्ट्रांनी एकमेकांचे सार्वभौमत्व मान्य करावे,' 'प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य व स्वायतत्ता असावी. 'कोणत्याही राष्ट्राने अन्य राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करु नये' 'कोणत्याही राष्ट्राने अन्य राष्ट्रांवर आक्रमण न करता समानतेच्या भूमिकेतून परस्परांचा मान राखावा' आणि शांततामय सहजीवनाला अनुकूल अशी मनोवृत्ती व परिस्थिती यांचा विकास करावा' अशा पंचशील तत्त्वांमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरु 'शांतिदूत' म्हणून ओळखले जाऊ लागले. मात्र हे पंचशील नेहरुंच्या स्वप्नाळू व काव्यमय कल्पनांमुळे नीटसे यशस्वी झाले नाही तरी ते धोरण म्हणून स्तुत्यच ठरते.

'विरोधकांना भुलविणारे नेहरु' या लेखात नेहरुंचे विरोधकही नेहरुंच्या वक्तव्याने कसे प्रभावीत होत याची अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे.

एकंदरीत नेहरुंच्या राजकारणात त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य चळवळीस दिलेले महत्त्वपूर्ण योगदान, सर्वस्वाचा त्याग त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्राच्या जडणघडणीसाठी केलेले महत्त्वपूर्ण कार्य, आर्थिक नियोजन, समाजवादी राजकारण, मिश्र अर्थव्यवस्था,अलिप्तता वादाचा पुरस्कार यांच्या माध्यमातून त्यांनी समता, स्वातंत्र्य, स्नेह, सहिष्णुता बंधुत्व या गोष्टी जोपासण्यासाठी आणि जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले.

3. 'नेहरुवादा' चे स्वरुप –

'नेहरुवाद' या नेहरुंवरील मृत्युलेखांमधून नेहरुंच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले आहे. नेहरुंनी आयुष्यभर राष्ट्रीय विकासाच्या योजनांवर आणि आर्थिक समतेवर भर दिला. तसेच संसदीय पद्धतीचा, मतदान स्वातंत्र्याचा, भाषण, मुद्रण, सभा, धर्म, राजकीय पक्ष, नागरिक हक्क यांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. तसेच व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही मूल्यांची जोपासना, समाजवादी दृष्टिकोन, नियोजनबद्ध अर्थव्यवस्था यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. ही नेहरुंच्या विचारांमधील प्रगतीशील विचारसरणी म्हणजेच 'नेहरुवाद' होय. "उदारमतवाद, समाजवाद, गांधीवाद आणि राष्ट्रवाद यांचा समन्वय नेहरुंच्या विचारसरणीत झाला होता."[5] मात्र हा नेहरुवाद व्यवहारी वृत्तीपेक्षा स्वप्नाळू व कल्पनांच्या भरा–याच अधिक मारत असल्याने तो प्रत्यक्षात यशस्वी होणे अवघड गेले. नेहरु स्वभावाने आणि संस्काराने व्यक्तिवादी पण बुद्धीने समाजवादी होते. तात्विक पातळीवरती ही विचारसरणी उच्च दर्जाची असली तरी व्यावहारिकदृष्टया मात्र ती प्रत्यक्षात येणे अवघड गेल्याने

'नेहरुवाद' कसा अयशस्वी ठरला याचे विवेचन या लेखात आले आहे.

4. 'नेहरुंचे आर्थिक विचार'

राष्ट्रीय विकासामध्ये आर्थिक समतेवर नेहरुवादांचा विशेष भर दिसून येतो. त्या दृष्टिकोनातूनच त्यांनी पंचवार्षिक योजना, समाजवादी समाजरचना आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्था ही ध्येये ठरवून त्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सुधारणा करीत असताना नैतिक मूल्यांवर आणि अहिंसेवर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विचारांवर गांधीवादाचा प्रभाव होता. त्यांनी आखलेल्या योजनाबद्ध पंचवार्षिक योजना जरी पूर्णपणे यशस्वी झाल्या नाहीत तरीदेखील त्यामधून राष्ट्रविकासाच्या दृष्टीने त्यांची दूरदृष्टी, ध्येयनिष्ठा आणि आशावाद दिसून येतो. गांधीजींच्या अहिंसावादाचा, आणि मार्क्सच्या वर्गविहीन समाजरचनेचा प्रभाव त्यांच्या अर्थकारणावर असल्याने त्यांनी स्वतःला क्रांतिवादापासून दूर ठेवले. भारताची आर्थिक प्रगती झाल्याशिवाय भारतात लोकशाही यशस्वी होणार नाही यासाठी नेहमीच त्यांनी भारताच्या आर्थिक भवितव्याचा विचार केला. राजकारणात जरी त्यांनी गांधीजींची विचारधारा स्वीकारली होती तरीदेखील "गांधीवादाचा नीरस नि रुक्ष दृष्टिकोन त्यांनी कधी मान्य केला नाही. गांधीजींनी दारिद्र्याचा उदोउदो केला. तर नेहरुंनी स्पष्ट सांगितले की, दरिद्री माणसाविषयी मला जिव्हाळा वाटत असला तरी दारिद्र्याचा मी द्वेष करतो."[16] दारिद्र्य, निरक्षरता, निकृष्ट राहणीमानाबद्दल त्यांना कमालीचा संताप होता. अर्थात त्यांच्या राजवटीत त्यांना अभिप्रेत असलेला आर्थिक विकास त्यांना साधता आला नाही हे त्यांचे अपयश होय. 'भारताचे ऋतुराज', 'रसिकराज नेहरु', आणि 'नेहरुवाद' या लेखांमधून अत्र्यांनी नेहरुंचे आर्थिक विचार सांगत असताना त्यांचे आर्थिक तत्त्वज्ञान स्पष्ट केले आहे पण ते हे तत्त्वज्ञान वास्तवात आणू शकले नाहीत याबद्दलची मर्यादाही व्यक्त केली आहे.

*** नेहरुंचे स्वभावविशेष व कौटुंबिक पार्श्वभूमीवरील व्यक्तिमत्त्व –**

1. नेहरुंचे प्रेमजीवन व वैवाहिक जीवन'

'नेहरु आणि गुलाब' या लेखात अत्र्यांनी नेहरुंच्या प्रेमजीवनावर आणि वैवाहिक जीवनावर भाष्य केले आहे. नेहरु आपल्या शेरवानीवर रोज गुलाबाचे ताजे टवटवीत फूल लावत असत. ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभूनही दिसे. पण अत्रे नेहरुंच्या या कृतीमागील स्थितीचा शोध घेताना त्यांना आवडणाऱ्या गुलाबाचा संबंध त्यांच्या प्रेमजीवनाशी जोडतात. गुलाबाचे फूल हे सर्व प्रेमिकांच्या दृष्टीने प्रेमाचे प्रतीक. नेहरुंच्याही जीवनात या गुलाबाला अनन्यसाधारण महत्त्व होते. 'कमला' या काश्मिरी गुलाबावर त्यांनी प्रेम केले. नेहरुंची सुविद्य पत्नी म्हणून 'कमला' ने नेहरुंच्या आयुष्यात

प्रवेश केला. पण त्यांची प्रीती मोहरता मोहरताच कोमेजून केली. आपल्या मोहरलेल्या संसारात ते फारसे रमले नाहीत. याचे कारण म्हणजे नेहरुंच्या मनाला पडलेली गांधीजींची मोहिनी. कमला आणि जवाहरलाल नेहरु यांच्या संसारवेलीवर 'इंदिरा' हे टपोरे फूल उमलले. चैन व विलास यांची रेलचेल त्यांच्या संसारात होती. त्यांचे वैवाहिक जीवन आनंदात आणि सुखात व्यथीत होत होते. पण कमला नेहरुंच्या वाटयाला जवाहरलाल नेहरुंचे प्रेम फारसे आले नाही. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीत नेहरु सामील होताच त्यांचे कौटुंबिक जीवन कोलमडून पडले. त्यांचे विलासी आणि ऐषआरामी जीवन बदलून गेले आणि त्याऐवजी त्यागाच्या आणि तुरुंगवासाच्या जीवनाला सुरुवात झाली. नेहरुंना वेळोवेळी पत्कराव्या लागलेल्या तुरुंगवासामुळे साहजिकच त्यांचे संसाराकडे आणि पर्यायाने पत्नीकडे दुर्लक्ष होऊ लागले. पण ही गोष्ट कमला नेहरुंनी कधीही मनाला लावून घेतली नाही. उलट आपला पती स्वातंत्र्यलढयाचा सेनापती झाला आहे म्हणून त्याही भारावून गेल्या आणि त्यामुळे साहजिकच त्यांच्या प्रकृतीची आबाळ त्यांनीच करुन घेतल्याने त्या वरचेवर आजारी पडू लागल्या. त्यांचे शरीर आजाराने पुरते पोखरले गेले. तरीही त्याचा परिणाम मात्र त्यांच्या चेह-यावर कधीच झाला नाही. प्रौढ वयात देखील त्या एखाद्या तरुण मुलीप्रमाणेच दिसत असत.

उत्तरोत्तर त्या कमालीच्या खंगत गेल्या. 1934 सालानंतर तर त्यांची प्रकृती फारच बिघडली. तेंव्हाही नेहरु तुरुंगातच होते. इंग्रज सरकारने त्यांना अधूनमधून पत्नीला भेटण्याची परवानगी दिली होती. परंतु कमला नेहरुंची प्रकृती जास्तच बिघडली तेंव्हा नेहरुंना अकरा दिवसासाठी तुरुंगातून सोडण्यात आले. त्यावेळी त्यांना कितीतरी वर्षांनी आपल्या पत्नीच्या सान्निध्यात बसून रुग्ण शय्येवर सोबत केली. पुढे त्यांना उपचारासाठी जर्मनीमध्ये नेण्यात आले. यावेळी इंग्रज सरकार नेहरुंना यापुढे राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर तुरुंगातून सोडायला तयार झाले. पण ही अट स्वीकारण्यास खुद्द कमलानेच नेहरुंना अटकाव केला. एकीकडे मातृभूमी आणि दुसरीकडे प्रिय पत्नीचे प्राण अशा कात्रीत नेहरु सापडले. त्यात त्यांनी पत्नीच्या इच्छेप्रमाणे स्वतःला मातृभूमीच्या दास्यमुक्तीसाठी वाहून घेतले. परिणामी त्यांना पुन्हा तुरुंगवास झाला. दरम्यान कमलाची प्रकृती जास्तच बिघडल्याने सरकारने त्यांची मुदतीपूर्वीच सुटका केली. ते ताबडतोब जर्मनीला गेले. नेहरुंना पाहून त्यांना थोडे बरे वाटले. पुढील उपचारासाठी ते त्यांना घेऊन लंडनला गेले. पण पुन्हा त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना घेऊन ते परत लाउझानला आले आणि 28 फेब्रुवारी 1936 रोजी तेथेच त्यांची प्राणज्योत मालवली.

एकंदरीत या लेखातून नेहरुंनी पत्नीविरहाचे रीतेपण आयुष्यभर जोपासले. आणि एकटेपणाचे काटे बोचत असतानाच त्यांनी ते कोणाला दिसू नयेत म्हणून आपल्या छातीवर आयुष्यभर गुलाबाला स्थान दिले हे अत्र्यांनी मोठया करुणरम्य शैलीत, आर्तता, व भावगंभीरपणे सांगितले आहे. यातून नेहरुंच्या ह्दयद्रावक प्रेमकहाणीचे प्रत्यंतर येते.

2. 'व्यासंगी व रसिक व्यक्तिमत्त्व' –

नेहरुंच्या व्यासंगाचे आणि रसिकतेचे दर्शन 'सूर्यास्त' मधील बहुतेक लेखांमधून घडते. 'नेहरु आणि गांधीजी', 'नेहरुवाद', 'रसिकराज नेहरु', 'लोकप्रिय नेहरु', 'नेहरु आणि गुलाब', 'ऋतुसंहार', ' अखेरचा प्रणिपात', ' अखेरची इच्छा', या लेखांमधून नेहरुंनी इंदिरेला लिहिलेल्या पत्रांमधून त्यांच्या व्यासंगी व रसिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन अत्रे घडवतात.

नेहरु गांधीजींचे तरुण अनुयायी होते. गांधीजींचे व्यक्तिमत्त्वही व्यासंगी होते पण त्यांच्या व्यासंगात आणि राजकारणात अध्यात्माचे आणि गूढवादी मंत्रतंत्राचे बरेचसे प्राबल्य होते. मात्र नेहरुंचे व्यक्तिमत्त्व मूळातच बुद्धिवादी असल्याने ते ईश्वरी अस्तित्व मानत नसत. त्यांच्या विचारात भौतिक क्रांतीला महत्त्वाचे स्थान होते : तत्त्वज्ञान, राजकारण, अर्थशास्त्र यांचा नेहरुंचा प्रचंड अभ्यास होता. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वात रसिकता नव्हती मात्र नेहरुंच्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वाला रसिकतेची सुंदर किनार होती. गांधींच्या वेषात स्वच्छता, उपयुक्तता यावर विशेष भर असे तर नेहरुंच्या वेषात त्यांच्या सौंदर्यदृष्टीचे प्रत्यंतर येत असे. 'गांधीजी आणि नेहरु' या लेखातून अत्रे अशा प्रकारे गांधी व नेहरुंच्या व्यक्तिमत्त्वातील साम्यभेदातून नेहरुंच्या व्यासंगी व रसिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. 'नेहरुवाद' या लेखात नेहरुंच्या वैचारिकतेचे व व्यासंगाचे दर्शन घडवताना अत्र्यांच्याही व्यासंगाचे स्वाभाविकपणे दर्शन घडते. नेहरुंना विज्ञानाबद्दल असणारी श्रद्धा, ज्ञान विज्ञानावरील विश्वास, देवभोळेपणाचा तिटकारा, ते मानत असणारे मार्क्सवादाचे बौद्धिक ऋण यामधून त्यांच्या विचारांमध्ये पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा विशेष प्रभाव असल्याचे दिसून येते. मात्र सारे पाश्चात्य तत्त्वज्ञान जसेच्या तसे स्वीकारण्यास त्यांचा विरोध होता. त्यांचा दृष्टिकोन जरी समाजवादी असला तरी समाजवादाचे भारताला हवे तसे भारतीयीकरण केल्याशिवाय तो इथे रुजणार नाही हे त्यांनी ओळखले होते. लेनीन, मुसोलिनी, मार्क्स, गांधी यांचे तत्त्वज्ञान त्यांनी कोळून पिले होते. भगवान गौतम बुद्धाच्या विचारांचाही त्यांच्या मनावर पगडा असल्याने जगात 'युद्ध नको शांतता हवी' असा त्यांचा शांततावादी दृष्टिकोन निर्माण झाला होता. अनेक इंग्रजी आणि उर्दू कवींच्या कित्येक कविता त्यांच्या तोंडपाठ होत्या. 'रसिकराज नेहरु' या लेखातून त्यांच्या उदात्ततेचे व रसिकतेचे जागोजागी प्रत्यंतर येते.

नेहरुंच्या रसिकतेचे प्रत्यंतर त्यांच्या शरीरप्रकृतीपासून, पोशाखापासून ते त्यांच्या विचारांपर्यंत शिगोशिग भरुन वाहताना अत्र्यांना जाणवते. 'ऋतुसंहार' या लेखात तर अत्रे नेहरुंच्या रसिकतेची व व्यासंगाची तुलना कालिदासाशी करतात. नेहरु नगरच्या तुरुंगात असताना त्यांनी कालिदासाच्या 'शाकुंतल', 'मेघदूत' आणि बाणभट्टाची कादंबरी 'या ग्रंथाच्या मूळ संस्कृत प्रती मागवून अभ्यासल्या होत्या. त्यामुळे या कलाकृतींचा त्यांच्या मनावर संस्कार झाला. कालिदासाच्या प्रतिभेचा रमणीय अविष्कार 'ऋतुसंहार' या काव्यात झाला आहे. कालिदासाने वर्णन केलेल्या ग्रीष्म ऋतूपासून ते वसंत ऋतूपर्यंत अत्रे नेहरुंच्या स्वभावाचे विभ्रम ऋतूंशी जुळवतात. खरे तर वर्षाचा शेवट शिशिर ऋतूत होतो पण कालिदासाला मात्र वर्षाची समाप्ती वसंतामध्ये व्हावी असे वाटते म्हणून तो हे काव्य वसंत ऋतूत संपवतो. अत्रे म्हणतात, "नेहरुंच्या जीवनाचे तसेच झाले. त्यांच्या आयुष्यात अनेक ऋतू येऊन गेले....... त्यांच्या आयुष्याचा शिशिरही अखेर संपला आणि त्यांच्या आयुष्याचे कमळपुष्प काळरुपी हत्तीने अकस्मात तोडून नेले. 'हा हन्त हन्त नलिनी गजमुज्जहार ! असे असूनही आज आपल्यासमोर वसंत ऋतूच्या नवप्रफुल्लित स्वरुपामध्ये नेहरु उभे राहतात."[7] अत्र्यांचे हे वक्तव्य त्यांच्या अचाट कल्पनाशक्तीचे आणि रसिकतेचे प्रत्यंतर घडवते.

'अखेरच्या प्रणिपात' आणि 'अखेरची इच्छा' ह्या लेखांतूनही अत्रे नेहरुंच्या व्यक्तित्त्व दर्शनाबरोबरच त्यांच्या रसिकतेचे आणि जनसामान्यांमधील नेहरुंच्या लोकप्रियतेचे दर्शन घडवतात. मृत्युलेखाच्या शीर्षकापासूनच या लेखात अथांग कारुण्य व निस्सीम काव्यमयतेची जाणीव होते. या लेखात नेहरुंनी आपल्या मृत्युपत्रात लिहिलेल्या मजकुरामधून नेहरुंच्या मनातील काव्यच व्यक्त झाले आहे. जणू काही त्यांनी आपले सारे जीवन सर्वस्वच राष्ट्राला अर्पण केले आहे. आपल्या मृत्यूची नेहरुंना जाणीव झाल्यानंतर त्यांनी मृत्यूपासून पळ काढला नसून साक्षात मृत्यूलाच काव्यमय रीतीने त्यांनी कसे आपलेसे केले ते अत्रे मोठया रसपूर्ण शैलीत सांगतात. पंडितजींचे जीवनच मुळात काव्यमय होते. आयुष्यभर त्यांनी रसिकता व खिलाडू वृत्ती जोपासली. त्यामुळेच त्यांना अखेरीस मरणाचे भय वाटले नाही. जीवनाच्या आणि राजकारणाच्या रुक्ष व्यवहारातही त्यांनी आपल्या रसिकतेचा गुलाब कायम टवटवीत ठेवला. जीवनातील सौंदर्याचा शोध घेण्याची वृत्ती त्यांनी अखेरपर्यंत जोपासली. अशा या सौंदर्यपूजक आणि निसर्गसौंदर्याचे चाहते असणा–या नेहरुंविषयी अत्रे जेंव्हा लिहू लागतात तेंव्हा त्यांच्या राजकाणापासून ते वाङ्.मयापर्यंत, विविध कलांमध्ये व खेळांमध्ये त्यांच्या रसिकतेचे रम्यदर्शन कशा प्रकारे होते ते तपशीलवार सांगत जातात.

३. 'मुलांचे चाचा नेहरु' (नेहरुंना असणारे मुलांबद्दलचे प्रेम)

'चाचा नेहरु' या मृत्युलेखात अत्र्यांनी नेहरुंच्या निरागस आणि खेळकर व्यक्तिमत्त्वावर भाष्य केले आहे. नेहरुंना लहान मुलांबद्दल अपरंपार जिव्हाळा वाटत असे. त्यांनी आयुष्यभर मुलांवर मनापासून प्रेम केले. त्यांचे फक्त त्यांच्या नातलगांमधील किंवा भारतातील मुलांवर प्रेम होते असे नाही तर जगभरातली सारी मुले त्यांना आवडत असत. म्हणूनच ते मुलांचे 'चाचा नेहरु' म्हणून जगभर प्रसिद्ध होते. लहान मुलांमध्ये ते कमालीचे रमत असत. याचे कारण म्हणजे नेहरु वृत्तीनेच निरागस आणि खेळकर होते. लहान मुलांमध्ये असणारी बरीचशी लक्षणे सत्तरी उलटल्यावरही त्यांच्यात शाबूत होती. खोडकरपणा, चेष्टखोरपणा, लहान मुलासारखाच हट्टीपणा त्यांच्यात होता. पण लहान मूल जसे कोणत्याही एका भावावस्थेत फार काळ राहात नाही तसेच नेहरुंच्याही व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांचे अंतःकरण लहान मुलासारखे अतिशय पारदर्शक होते. त्यांनी प्रौढपणीही स्वतःमधील बालकाला जपल्यामुळेच ते बालकांची मने आणि भावना समजू शकत होते. नेहरुंचा वाढदिवस म्हणजे सर्व मुलांना आनंदाची पर्वणीच असे. दसरा दिवाळीपेक्षाही जास्त उल्हासाने नेहरुचाचांचा वाढदिवस मुले साजरा करीत असत. कित्येक मुलांचे हट्ट ते स्वतः पैसे खर्च करुन पूर्ण करीत असत. त्यामुळे मुले त्यांच्याकडे हट्ट करीत असत. मुले दिसली रे दिसली की, ते देहभान विसरुन जात असत. मोठया माणसांनी त्यांना घातलेल्या हारांमध्ये त्यांना फारसे स्वारस्य नसे पण मुलांचे हार मात्र ते आपली मान खाली वाकवून घालून घेत असत. मुलांच्या मेळाव्यात फिरताना त्यांना आपण फुलांच्या ताटव्यातूनच फिरत आहोत असे वाटे. नेहरुंच्या स्वभावातील कित्येक खेळकरपणाचे नमुने अत्रे मोठया खेळकर शैलीत सांगतात. नेहरुंना मुलांइतकेच फुलांचेही वेड होते. वैयक्तिक जीवनातील एकाकीपणाचे दुःख ते मुलाफुलांमध्ये रमून विसरत असत. त्यांना मुलांचे वेड होते त्यामुळे मुलांनाही त्यांचे वेड होते. 'चाचा नेहरु गेले' म्हणून देशातील कोटयवधी मुलांनी हंबरडे फोडले. स्वतःच्या आईवडिलांहूनही मुलांनी नेहरुंवर अधिक प्रेम केले ते नेहरुंच्या मनाला असणाऱ्या मुलांबद्दलच्या आकर्षणामुळेच. अत्र्यांनी नेहरुंच्या स्वभावातील खेळकरपणा, खोडकरपणा कसा बालमनोवृत्तीचाच होता हे 'चाचा नेहरु' या नेहरुंवरील मृत्युलेखातून सांगितले आहे. हे सांगत असताना अत्र्यांच्या भाषेला कमालीचा निथळपणा व सौंदर्य प्राप्त होते.

४. नेहरुंचे वक्तृत्व' –

'लोकप्रिय नेहरु', 'भारताचे ऋतुराज' या लेखांमधून अत्र्यांनी नेहरुंच्या वक्तृत्वावर भाष्य

केले आहे. नेहरुंना त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि वक्तृत्वामुळे प्रचंड लोकप्रियता मिळाली. नेहरुंचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व पाहाण्यासाठी ब-याच वेळा लोक त्यांच्या सभेला येत असत. पण ते केवळ दिसायलाच सुंदर होते असे नाही तर त्यांच्या वक्तृत्वाला आणि विचारांनाही प्रगल्भता होती. त्यांच्या राजकीय विचारांची आणि आवेशपूर्ण वक्तृत्वाची छाप जनतेवर होती. त्यांना जनतेबद्दल असणारी तळमळ त्यांच्या वक्तृत्वातील आवेशातून व्यक्त होत असे. ते जसे बोलत असत तसतशा भावछटा त्यांच्या चेह-यावर व्यक्त होत असत. त्यांच्या वक्तव्यात उदात्त विचारांचा आणि भव्य साक्षात्काराचा अविष्कार असे. "त्यांच्या वक्तृत्वाचे वैशिष्टय असे की ते केवळ जिभेने नव्हे तर शरीराने बोलत."[8] त्यांच्या वक्तृत्वाला त्यांच्या बोलक्या चेह-याची जोड मिळाल्याने त्यांची चर्चा क्षणाक्षणाला पालटत असे. त्यामुळे त्यांची भाषणे ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात असत. त्यांच्या भाषणांमधून ते गांधीजींप्रमाणे अध्यात्मवादी गूढगुंजन करीत नसत तर ते आधुनिक राजकारणाच्या भाषेत बोलत. काळाबाजार, लाचलुचपत, दारिद्रय याविरुद्ध ते चिडून त्वेषाने बोलत. एखाद्या जाहीर सभेत गडबडगोंधळ दिसला तर ते संतापून श्रोत्यांच्या जमावामध्ये धक्काबुक्की करीत आणि जनता त्यांचा मार खाण्यातही धन्यता मानत असे. कारण नेहरुंबद्दल जनतेच्या मनात भक्ती होती. जनतेने नेहरुंना त्यांच्यामधील दोषांसह स्वीकारले होते. अत्र्यांनी नेहरुंचे वक्तृत्व, त्यांच्या विचारांतील प्रगल्भता, बोलका चेहरा, तसेच त्यांच्या लोकप्रियतेची इतर नेत्यांशी तुलना करुन नेहरु कसे सरस होते याचे विवेचन केले आहे.

5. पत्रांमधून व्यक्त होणारे नेहरुंचे जीवनविषयक विचार' ('पत्रलेखक नेहरु') –

माणसाने माणसाला लिहिलेले पत्र म्हणजे त्याच्या मनाचं भावगीत असतं. नेहरुंच्या मनातील पत्ररुपाने व्यक्त झालेल्या भावगीतांबद्दल अत्र्यांनी 'नेहरुंचे अंतरंग' या लेखात भाष्य केले आहे. त्यांनी लिहिलेल्या पत्रांमधून कौटुंबिक जिव्हाळया-बरोबर त्यांच्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचे व रसिकतेचे दर्शन घडते. त्यांची धाकटी बहीण कृष्णा आणि लाडकी कन्या इंदिरा या दोघींना त्यांनी लिहिलेल्या पत्रांमधून त्यांचे अंतरंग स्पष्ट होते. त्यांची पत्रे म्हणजे त्यांच्या मनाची भावरम्य स्वगते आहेत. इंदिरेला लिहिलेल्या पत्रातून ते आपल्या कन्येला जगाचा इतिहास समजावून सांगतात. जगाच्या इतिहासातील पराक्रमी पुरुषांची स्फूर्तिदायक चरित्रे वाचायला सांगून तिने प्रकाशाशी स्नेह करावा असा उर्जस्वल सल्ला देणारा पिता या पत्रांमधून व्यक्त होतो. तसेच कृष्णाला लिहिलेल्या पत्रात त्यांचे शिक्षणविषयक, जीवनविषयक विचार व ध्येयवादी दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. शिक्षणात स्वावलंबन, जिज्ञासा, आरोग्य यावर ते भर देतात. तसेच जर जीवनाचा आनंद आणि आस्वाद

ध्यायचा असेल तर मनुष्याचे आरोग्य आणि प्रकृती उत्तम असावयास हवी यासाठी प्रकृतीची काळजी घेणे त्यांना अतिशय महत्त्वाचे वाटते. त्यांचे निसर्गाविषयीचे आकर्षण व वेडही बहुतेक पत्रांमधून व्यक्त झाले आहे. ते पत्र लिहित असताना खाजगी भाग बराचसा कमी करतात आणि व्यापक ध्येयवाद, त्याग, जीवनविषय श्रद्धा, याविषयी अधिक विवेचन करीत असताना त्यांचे अंतरंग मोकळे होत जाते. आपल्या बहिणीला लिहिलेल्या एका पत्रामध्ये ते म्हणतात, "मला बाप नाही, आई नाही, भाऊ नाहीत, बायको नाही की मुलगा नाही. त्यामुळे पत्र लिहिण्याचे माझे क्षेत्र फारच मर्यादित झाले आहे. मुलगी आणि बहीणी यानांच फक्त मी पत्रे लिहू शकतो."[10] यावरुन त्यांच्या मनातील एकटेपणाचे शल्य जाणवते. मात्र हा एकटेपणा घालविण्यासाठी ते निसर्गाशी नाते जोडतात. जगाच्या इतिहासाकडे डोळस दृष्टिकोनातून पाहतात. त्यांच्या शिक्षणविषयक दूरदृष्टीचे विचार त्यांच्या कित्येक पत्रांमधून व्यक्त होतात. उदात्त ध्येयनिष्ठांचा अंगिकार, स्वावलंबन, शरीर व मनाची सुदृढता, जीवनविषयक जिज्ञासा, अशा अनेक जीवनमूल्यांचा त्यांनी घेतलेला ध्यास या पत्रामधून व्यक्त होतो. ते पत्रांमधून विचारांना चालना देतात आणि जीवनविषयक चिंतनही करतात. जीवनविषयक संदेश देतात. जीवनातील समस्या, अनुभूती ते मोठया जिव्हाळयाने मांडतात. त्यामुळे त्यांच्या शब्दांना एक प्रकारचे भाववलय प्राप्त होते. त्यांच्या अंतःकरणातील सहृदयता, समंजसपणा, काव्यमय भावनाशीलता आणि उदात्त चिंतनशीलता, ध्येयवादी दृष्टिकोन व त्याग यांचे प्रतिबिंब त्यांच्या पत्रलेखनात जागोजागी कसे झाले आहे हे अत्र्यांनी काव्यमय व आलंकारिक भाषेत व्यक्त केले आहे. नेहरुंची पत्रे म्हणजे नेहरुंचे अक्षय विचारधन आहे असे म्हटल्यास काहीच वावगे होणार नाही.

6. <u>'नेहरुंचे मृत्यूविषयक विचार' (काव्यमय दृष्टिकोन)</u> –

नेहरुंच्या पत्रलेखनातून तर त्यांचे जीवनविषयक विचार व्यक्त झालेच आहेत पण त्यांच्या मृत्यूविषयक विचारांमधूनही काव्यमय पद्धतीने जीवनविषयक विचार कसे व्यक्त झाले आहेत हे 'अखेरचा प्रणिपात', 'अनंताची हाक', आणि अखेरची इच्छा' ह्या तीन लेखांमधून अत्र्यांनी व्यक्त केले आहे. नेहरुंना जीवनाप्रमाणेच मरणाचेही आकर्षण होते. जीवनात त्यांना आपल्या अनेक प्रियजनांची मरणे सहन करावी लागली आणि त्यातूनच त्यांना मृत्यूविषयक तत्त्वज्ञान सुचले असावे. मृत्यूचे त्यांना कधी भय वाटले नाही. त्यांच्या मृत्यूविषयक विचारांमधून त्यांच्या आयुष्याच्या अंतसमयीही ते किती निश्चल होते याची कल्पना येते. त्याचबरोबरीने त्यांचे सश्रद्ध मनही व्यक्त होते. नेहरुंनी आपल्या टेबलावर रॉबर्ट फास्ट ह्या अमेरिकन कवीच्या ज्या चार ओळी लिहून ठेवल्या

होत्या त्यामधून त्यांना येत असलेली 'अनंताची हाक' व्यक्त होते. 'अनंताची हाक' हा अत्र्यांनी नेहरुंविषयी लिहिलेला फक्त सात ओळींचा भावपूर्ण लेख आहे. ते केवळ कवितेचे भाषांतर राहात नाही तर ती नेहरुंच्या हृदयाची हाक होते. जीवनसंध्येची चाहूल लागल्यानंतर प्रत्येक माणसाचे मन हळवे होते. जीवन सोडून जायचे ही कल्पनाच मनुष्याला घायाळ करते. आयुष्यात कित्येक गोष्टी करायच्या राहून गेलेल्या असतात. बऱ्याच सुंदर गोष्टी समोर असतात पण त्यांना काळयाभोर अंधाराने वेढलेले असते. अजून कितीतरी वाटचाल करायची मनात असूनदेखील अंधाराची भीती मनात घर करुन राहते. मग स्वतःच स्वतःला धीर द्यावा लागतो. नेहरुंच्या मनातील अगम्य आशावाद अत्र्यांनी या छोटयाशा लेखात व्यक्त केला असून त्यांची कर्तव्यदक्षता, खंबीरपणे मृत्यूला साद घालण्याचे धैर्य या लेखातून व्यक्त होते. त्यांनी त्यांच्या अनेक जीवलगांचे मृत्यू अनुभवल्यामुळे त्यांच्या मनात हे मृत्यूविषयीचे धैर्य निर्माण झाले असावे. त्यांची प्रिय पत्नी कमला त्यांच्या आयुष्यात एकाकीपणाची पोकळी निर्माण करुन त्यांना अकालीच सोडून गेली. त्यांच्या वडिलांच्या अंत्यसंस्कारानंतर स्मशानातून परत येत असताना त्यांचे मन कमालीचे भकास होते मात्र आकाशातील तेजस्वी तारका प्रकाशत असल्याचा अनुभव त्यांनी घेतला होता. विजयालक्ष्मीच्या यजमानांचे जेंव्हा निधन झाले तेंव्हा तिचे सांत्वन करताना नेहरु म्हणतात, "प्रत्येक मृत्यूने व्यक्तीमधला आणि कुटुंबाकुटुंबामधला समतोल ढळतो. मध्येच एक खळगा पडल्यासारखे होते. हा खळगा तसाच राहतो आणि निसर्ग मात्र नवा समतोल निर्माण करतो."[10] अशा अनुभूतीतून त्यांचे हे मृत्यूविषयक विचार व्यक्त होताना त्यांचा मृत्यूविषयक उदात्त दृष्टिकोन व्यक्त होतो. मृत्यूकडे ते काव्यमय दृष्टिकोनातून पाहात असताना त्यांच्या निर्भय व्यक्तिमत्त्वाचे प्रत्यंतर येते. स्वतःच्या मृत्यूविषयीचे रमणीय भावकाव्य लिहून त्यांनी मृत्यूलाही कसे जिंकले याचे दर्शन अत्रे 'अखेरची इच्छा' या लेखात घडवतात. नेहरुंनी आपल्या मृत्युपत्राची सुरुवात मोठया काव्यमय वृत्तीने केली असून अखिलभारतवासीयांबद्दलच्या कृतज्ञतेची भावना त्यातून व्यक्त होते. तसेच रसिकताही व्यक्त होते. "माझ्या देहाच्या राखेपैकी मूठभर राख गंगेत टाका, असे माझ्या देहापुरते बोलायचे तर मी कोणत्याही धार्मिक भावनेने सांगितलेले नाही..... आलाहाबाद जवळून वाहत जाणाऱ्या गंगा व यमुना नद्यांशी लहानपणापासून मी मनाने बांधला गेलो आहे. गंगा नदीच्याभोवती भरतवंशाची अनेक संस्मरणे गुंफली आहेत. भारताच्या आशाआकांक्षा, जय–पराजय, यांची गंगा ही साक्षीदार आहे. भारतमातेच्या विजयाची गाणी तिने ऐकली आणि पराभवाच्या आक्रोशही तिने ऐकला. गंगा ही भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे व जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे. माझ्या देहाची थोडी तरी राख म्हणूनच गंगेत पडावी मात्र मूठभर राखेचे गंगेत विसर्जन

केल्यावर जी राख उरेल ती विमानातून उंच आकाशात न्यावी आणि उचावरुनच ती भारतभूमीवर विखरुन टाकावी. ज्या ठिकाणी भारतातील शेतकरी काबाडकष्ट करतो त्या शेतांतून ती पडावी. तिथल्या धुळीशी ती एकजीव व्हावी...."[11] ह्या नेहरुंच्या अखेरच्या इच्छेतूनच त्यांची मृत्यूविषयक स्वागतार्हता तर दिसून येतेच पण त्याच बरोबरीने भारतभूमीविषयीची निष्ठा व सौंदर्याचा ध्यासही व्यक्त होतो. त्यांच्या मनातील हिंदू संस्कृतीविषयीचे व भारताबद्दलचे प्रेम किती विलक्षण होते याचे मनोज्ञ दर्शन येथे घडते. निसर्गप्रेम, संस्कृती, जीवनविषयक प्रेम, भारताबद्दलची निष्ठा, कृतज्ञता, अपार मानवतावादी दृष्टिकोन यांचे हृदयस्पर्शी स्पंदन या लेखनातून अत्र्यांनी घडवले आहे.

7. ' नेहरुंच्या अंत्यविधीवरील 'अग्नेय स्वाहा' हा करुणरम्य मृत्युलेख –

'अग्नेय स्वाहा' या मृत्युलेखातून नेहरुंच्या अग्निसंस्काराचे अत्र्यांनी चित्रमय वर्णन केले आहे. ' नेहरुं' चा अंत हा केवळ एका व्यक्तीचा अंत नसून भारताच्या इतिहासातील एका युगाचा अंत आहे असे त्यांना वाटते. नेहरुंच्या मृत्यूमुळे अखिल जगतात जो हाहाःकार उडाला त्याचे वर्णन करताना ते कमालीचे शोक विव्हळ होतात. नेहरुंची अंत्ययात्रादेखील विराट निघाली. कोटयावधी देशबांधवांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. नेहरुंचा मृतदेह राजघाटावर चंदनकाष्ठांच्या राशीत ठेवला होता. सगळीकडे धाय मोकलून आक्रोश सुरु होताः हुंदक्यांनी दशदिशा गदगदून गेल्या होत्या. अग्नीस अर्पण केल्या गेलेल्या नेहरुंच्या देहाच्या ज्वाला अत्र्यांच्या भावविव्हल अंतःकरणास हलवत राहतात. अग्निसंस्काराचे वर्णन करीत असताना त्यांच्या लेखणीच्या करुणरम्य सौंदर्याचे प्रत्यंतर येते.

अत्र्यांची भावनाशीलता, काव्यात्मता आणि चिंतनशीलता यांचा एकत्रित प्रत्यय 'सूर्यास्त' मधील सर्वच लेखांमधून सलगपणे येत राहतो. पंडित नेहरुंच्या जीवनाच्या विविध पैलूंचे मनोज्ञ दर्शन या सतरा मृत्युलेखांमधून अत्र्यांनी घडवले आहे. "सूर्यास्त' मधील अत्र्यांचे लेखन चरित्रवजा होण्यापेक्षा काव्यमय अधिक बनले आहे. अत्र्यांच्या सहृदय व्यक्तित्त्वाचे ते भावोत्कट चित्र आहे."[12] त्यांच्या मनातील भावस्पंदनामधून हे लेखन साकारले असल्यामुळे साहजिकच ते भावोत्कट झाले असून आंतरिक जिव्हाळयाने ओथंबले आहे. अत्र्यांचा व्यासंग, रसिकता, संवेदनशीलता, भावोत्कटता, काव्यात्मता, चिंतनशीलता यांचा सुरेख समन्वय या लेखनात झाल्याने सर्वच लेखांना भावगांभीर्य प्राप्त झाले आहे. हे लेखन जरी वृत्तपत्रीय असले तरी त्याचे स्वरुप केवळ वृत्तपत्रीय राहात नाही तर त्यात कथात्मकता, काव्यात्मता, भावनकिता येते. 'नेहरु आणि गुलाब' हा मृत्युलेख पंडित नेहरु आणि कमला नेहरुंच्या हृदयद्रावक प्रेमकथेचे रुप घेतो. तर इतर सर्वच लेखांमधून काव्यात्मकता ,

वैचारिकता व भावनिकेतेचे प्रत्यंतर येते. अत्र्यांच्या व्यक्तिपूजकतेचे प्रत्यंतर ह्या लेखनात पानोपानी येत राहाते. अतिशय निथळपणे ते नेहरुंच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन घडवतात. त्यांचे चरित्र, कार्य, मर्यादा, सामर्थ्य, वैचारिकता, रसिकता, कुशल राजकारण, कौटुंबिक स्नेहभाव या सा–यांचे दर्शन त्यांच्या जीवनातील विविध घटना प्रसंगाच्या माध्यमातून घडवत असताना अत्र्यांच्या भाववृत्ती फुलून येतात. या लेखनात अत्र्यांच्या सश्रद्ध, व्यासंगी, व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. अत्रे केवळ घटना प्रसंगाचे वर्णन करुन थांबत नाहीत तर त्या अनुषंगाने त्या घटना, प्रसंगावर भाष्य करतात आणि वस्तुस्थितीचे दर्शनही घडवतात. नेहरुंवरील त्यांची अगाध श्रद्धा असली तरीदेखील नेहरुंच्या स्वभावातील काही चमत्कारिक भागही ते नमूद करतात. नेहरु व्यवहाराच्या वास्तववादी जगापेक्षा कल्पनासृष्टीच्या ढगांवरुनच अधिक भरा–या मारत ही त्यांच्या कर्तृत्वाची मर्यादाही अत्रे जाता जाता नमूद करतात.

उत्कट स्नेहार्द्रता, भावनांची आर्त वलये, वेधक व्यक्तिदर्शन, स्वभावचित्रण, यामुळे या लेखनास वाचनियता, प्रासादिकता व वेधकता आली आहे. नेहरुंच्या जीवनाचा विवेचक शोध अत्रे मोठया भावपूर्णतेने घेतात. 'सूर्यास्त' मधील सर्वच मृत्युलेखांमधून नेहरुंच्या जीवनाचा अत्र्यांचा काव्यमय लेखणीने घेतलेला भावोत्कट शोध आहे. सर्व लेखांची शीर्षकेदेखील नेहरुंच्या आणि अत्र्यांच्या देखील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. हळुवार स्पंदनांमधून आणि मार्मिक विवेचनामधून अत्र्यांनी नेहरुंच्या जीवनाचा जीवनव्यापी आढावा घेतला आहे.

## ✗ '<u>इतका लहान एवढा महान</u>' मधील लालबहादूर शास्त्रींवरील मृत्युलेखांचे स्वरुप आणि वैशिष्टये –

नेहरुंच्या निधनानंतर भारताच्या पंतप्रधानपदाची धुरा लाल बहादूर शास्त्रींकडे आली. पण पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर केवळ अठरा महिन्यांनंतर दुर्दैवाने त्यांचे आकस्मिक निधन झाले. या अल्पावधीत शास्त्रीजींनी देशहिताचे जे महत्त्वाचे निर्णय घेतले आणि त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली ती देशाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे. अत्र्यांनी अत्यंत आदराच्या भूमिकेतून 'इतका लहान एवढा महान' या संग्रहात अठरा मृत्युलेखांमधून शास्त्रीजींच्या जीवनाचा हा जीवनव्यापी आढावा घेत असताना अत्र्यांमधील गुणग्राहकता, व्यक्तिपूजकता, व्यासंग, देशनिष्ठा यांचे दर्शन घडते.

अत्र्यांनी या लेखनात खालील अंगाने शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले आहे.

* शास्त्रीजींचे राजकीय व्यक्तिमत्त्व –

1. शास्त्रींचे यशस्वी राजकारण –
2. शास्त्रींची राजकीय प्रामाणिकपणा –
3. शत्रू राष्ट्रानांही आपले वाटणारे शास्त्रीजी –

* शास्त्रीजींचे स्वभावचित्रण –

1. कमालीचा हळुवारपणा व प्रसंगनिष्ठ खंबीरपणा –

* भारतीय विचारसरणी व पूर्ण भारतीय व्यक्तिमत्त्व –

1. शास्त्रींची भारतीय परंपरा –

* शरीरप्रकृतीचे वर्णन –

1. 'इतका लहान एवढा महान' शीर्षकाची समर्पकता –
2. राहणीमानातील साधेपणा –

* शास्त्रींचे कौटुंबिक पार्श्वभूमीवरील व्यक्तिमत्त्व –

1. शास्त्रींच्या आईच्या दृष्टिकोनातून –
2. शास्त्रींच्या पत्नीच्या दृष्टिकोनातून –
3. शास्त्रींच्या नातवंडाच्या दृष्टिकोनातून –

* शास्त्रींच्या मृत्यूप्रसंगाचे व 'अस्थिविसर्जन' प्रसंगाचे कारुण्यपूर्ण चित्रण –

1. मृत्यूप्रसंगाचे चित्रण –
2. अस्थिविसर्जन प्रसंगाचे चित्रण --

**शास्त्रीजींचे राजकीय व्यक्तिमत्त्व –**

1) शास्त्रीजींचे यशस्वी राजकारण – भारताचाबहाद्दूरलाल, 'ताश्कंद विजय', 'शांतीदूत शास्त्रीजी', 'जयजवान जय किसान' या चार मृत्युलेखांमधून शात्रींनी केलेल्या यशस्वी राजकारणाचे चित्रण अत्र्यांनी केले आहे. शास्त्रींचे उभे आयुष्य तसे देशसेवेत गेले. राजकारणाशीही त्यांचा आयुष्यभर निकटचा संबंध होता. कॉंग्रेसच्या मंत्रीमंडळात नेहरुंच्या कारकिर्दीत ते मंत्रीपदावर होते. तसेच स्वातंत्र्यांच्या चळवळीतही त्यांनी वयाच्या 17 व्या वर्षापासून भाग घेतला. उभे आयुष्य त्यांनी देशसेवेत घालवले. नेहरुंच्या निधनानंतर त्यांच्याकडे चालून आलेल्या पंतप्रधानपदाचे त्यांनी अल्पावधीतही सोने केले. अवघ्या अठरा महिन्यांच्या काळात त्यांनी देशाचे जे यशस्वी नेतृत्व केले त्याचा ठसा त्यांनी जागतिक राजकारणावर उमटवला. म्हणूनच की काय अत्रे त्यांना 'भारताचा बहाद्दूरलाल' असे संबोधून त्यांच्या कार्याचा उचित गौरव करतात. या लेखात अत्रे घरगुती पद्धतीने

संवाद करावा त्याप्रमाणे शास्त्रींच्या आकस्मिक निधनावर भाष्य करुन हळहळ व्यक्त करतात. शास्त्रींच्या निधनावर अत्र्यांच्या भावनाशील मनाचा विश्वास बसत नाही. परंतु सत्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना या घटनेवर विश्वास ठेवणे भाग पडते. घरगुती भाषेत संवाद करता करता लेखाची भाषा एकदम काव्यमय वळण घेते आणि शास्त्रीजी ताश्कंद करारास गेले असताना तेथे त्यांचे अकस्मात निधन कसे झाले हे काव्यमय शैलीत ते सांगताना म्हणतात, " ताश्कंदला काय होणार ह्या एका विचाराने सारे जग गेल्या आठवडयात चिंताक्रांत झाले होते. संकटाचे ढग ताश्कंदवर एकसारखे गडगडत होते...... अमावस्येचा काळाकुट्ट अंधार चहूकडे पसरला होता. भारताच्या स्वाभिमानाचा आणि सार्वभौमत्वाच्या कसोटीचा तो बिकट क्षण होता. अशावेळी त्या अमावस्येच्या अंधारातून ज्याच्या तेजस्वी किरणांनी शांतता कराराची पौर्णिमा उदयास आणली, त्याच पूर्ण चंद्राला अखेर मृत्यूच्या राहूकेतूंनी अकस्मात खग्रास ग्रहण लावावे, यापेक्षा दुर्दैवाची अधिक क्रूर परिसीमा काही असू शकेल काय ? सतरा वर्षात जे घडले नाही, ते 'महाभारत' अठरा महिन्यात घडून आले. आणि ते अठरा पानांचे अद्भुत पर्व अवघ्या सात मिनिटात समाप्त व्हावे "[13] अशा शब्दात ते शास्त्रींच्या निधनाचे भावकाव्य गातगातच त्यांनी अल्पावधीतच देशपातळीवरील अनेक आघाडयांवर केलेल्या कार्यावर भाष्य करीत असताना नेहरुंच्या तुलनेत शास्त्रींचे वेगळेपण नमूद करीत जातात. नेहरु व शास्त्री यांच्यात तिळमात्रही साम्य नसून कार्याच्या बाबतीत शास्त्रीजी अल्पावधीतही कसे उजवे ठरतात याचे अनेक दाखले ते देतात. शेवटी शेवटी तर "नेहरुंचे अठरा वर्षाचे पाप निस्तरण्यासाठी परमेश्वरानेच शास्त्रीजींच्या रुपाने अठरा महिन्यांचा हा महान अवतार घेतला असावा असेच आम्हाला वाटते."[14] अशी स्पष्ट तुलना अत्रे करतात तेंव्हा 'सूर्यास्त' मधून नेहरुंविषयी लिहिणारे अत्रे ते हेच का असा रोखडा प्रश्नपडतो. गांधी आणि नेहरु यांचा मोठेपणा ते नाकारत नाहीत. पण शास्त्री ह्या दोन्ही नेत्यांहून कसे अधिक महान होते याचा निर्वाळा ते पदोपदी देतात.

'ताश्कंद विजय' या लेखामध्ये ऐतिहासिक 'ताश्कंद करार' घडवून आणण्यामागील शास्त्रींच्या यशावर अत्रे भाष्य करतात. ह्या लेखाचे स्वरुप बरेचसे तपशीलतेचे असल्यामुळे सर्वत्र तपशील सांगूनच अत्रे शास्त्रींच्या कार्यावर भाष्य करतात. 'शांतिदूतशास्त्रीजी' ह्या लेखात शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर जगभरातील देशांच्या नेत्यांनी पाठविलेल्या दुखवटयांच्या संदेशामधून शास्त्रींचा शांततावादी दृष्टिकोन कसा स्पष्ट होतो याचे विवेचन केले आहे.

'जय जवान जय किसान' ही शास्त्रींनी केलेली घोषणा शास्त्रींच्या द्रष्टेपणाची आणि भारताच्या उद्धाराची तळमळ व्यक्त करणारीच होती. या लेखात शास्त्रींच्या या घोषणेमधील त्यांचा

दूरगामी दृष्टिकोन, द्रष्टेपणा, यावर भाष्य करीत असताना 'सूर्यास्त' मध्ये सर्वत्र नेहरुंच्या कार्याचा व जीवनाचा गवगवा करणारे अत्रे जेव्हा नेहरुंची व शास्त्रींची तुलना करतात. तेव्हा दोघांच्याही कार्याचे रास्त मूल्यमापन करुन नेहरुंच्या चुकांचे दिग्दर्शन अतिशय परखडपणे करतात. "गांधी – नेहरुंनी ह्या देशात अहिंसेचे एवढे स्तोम माजवून ठेवले होते, की रामायण आणि महाभारत कालापासून चालत आलेल्या क्षात्रतेजाच्या महान परंपरांचा ह्या राष्ट्राला जवळजवळ विसरच पडलेला होता."[15] याचा परिणाम म्हणूनच नेहरुंच्या कारकीर्दीत चीनने भारताच्या सीमेचा हजारो चौरस मैलांचा प्रदेश बळकावूनही ह्या गोष्टीकडे नेहरुंनी दुर्लक्ष केले. पाकिस्तानने केलेली आक्रमणेही भारताने जीव मुठीत घेऊन सहन केली. मात्र शास्त्रींनी पाकिस्तानशी टक्कर देण्याचा जो निर्णय घेतला त्यामुळे भारताच्या सामर्थ्याची सा–या जगाला कल्पना आली. शेजारी देश आपल्यावर सशस्त्र आक्रमण करीत असताना त्यांना आपण अहिंसेचे तत्त्वज्ञान सांगत बसणे म्हणजे शुद्ध दुबळेपणा आहे हे शास्त्रींनीच ओळखले. म्हणूनच त्यांनी लष्करी सामर्थ्य वाढवून 'जयजवान' अशी घोषणा केली. त्याचप्रमाणे संरक्षणाबरोबरच देशात अन्नधान्यही मुबलक प्रमाणात पिकायला हवे. पोकळपणे देशाला 'सुजलाम् सुफलाम्' म्हणण्यातही काही अर्थ नाही. यासाठी जवानांनी देशाचे परकीय आक्रमणांपासून संरक्षण करावे आणि शेतक–यांनी जमिनी उत्तम त–हेने पिकवून देशाचे पोषण करावे असा 'जय जवान जय किसान' हा शास्त्रींनी दिलेला मंत्र अत्र्यांना शास्त्रींच्या दूरगामी विचारसरणीचा द्योतक वाटतो.

ह्या चार लेखांमधून अत्र्यांनी शास्त्रींच्या यशस्वी राजकारणावर भाष्य केले आहे आणि भारतीय राजकारणावर अगदी अल्प कालावधीतही शास्त्रींनी आपल्या वेगळेपणाचा ठसा कसा उमटवला हे अनेक दाखले देऊन सांगितले आहे. या लेखांमध्ये राजकारणाचा तपशील ब–याच अंशी आलेला असला तरीदेखील अत्र्यांच्या लेखणीच्या स्पर्शामुळे [illegible] या तपशीलात कोठेही रुक्षता येत नाही. उलट त्याद्वारे शास्त्रींच्या कर्तृत्वाचेच दर्शन घडते. लेखांची भाषा कधी घरगुती संवाद करावा तशी होते तर कधी काव्यमय होते. मात्र तिच्यात कोठेही क्लिष्टता येत नाही.

2. शास्त्रींची राजकीय नैतिकता व प्रामाणिकपणा –

'दरिद्र नारायण शास्त्रीजी', 'गृहहीन गृहमंत्री,' आणि 'सामान्यातील असामान्य' या तीन लेखांमधून अत्र्यांनी शास्त्रींच्या राजकीय नैतिकतेचे व प्रामाणिकपणाचे दिग्दर्शन केले आहे. महात्मा गांधी हे प्रत्यक्षात दरिद्री नसताना दरिद्री पद्धतीने राहून आपण दरिद्रनारायणाचे पूजक आहोत असे भासवत असत मात्र शास्त्रीजी अगदी लहानपणापासून दरिद्री जीवन जगत आले आणि ते जरी

भारताचे पंतप्रधान झाले तरीही दरिद्रीच राहिले. 'दरिद्र नारायण शास्त्रीजी' ह्या लेखात अत्र्यांनी शास्त्रींनी राजकीय नैतिकता आणि प्रामाणिकपणा कसा आचरणात आणला होता हे सांगत असताना कित्येक काँग्रेसी नेत्यांबद्दल आणि गांधीच्या दरिद्रनारायणपणाच्या ढोंगाबद्दल फिरकी घेतली आहे. मात्र शास्त्रीजी मरेपर्यंत दरिद्रीच राहिले. त्यांनी दरिद्रनारायणाचे जीवन आयुष्यभर अनुभवले. मरेपर्यंत पृथ्वीतलावर त्यांच्या मालकीचा जमिनीचा इंचभर तुकडादेखील नव्हता की त्यांना स्वतःचे घर नव्हते. यावरुन शास्त्रींच्या राजकीय नैतिकतेचे आणि प्रामाणिकपणाचे अत्र्यांनी मोठया प्रांजळतेने दर्शन घडवले आहे. या अनुषंगाने ते मोरारजी देसाई, सदोबा पाटील या पुढा-यांची खरमरीत हजेरी घेताना दिसतात. गांधीजींचा दरिद्र नारायणपणा तर अत्र्यांना अजिबात मान्य नाही. शास्त्री गांधीजींच्या दरिद्रनारायणाचे अनुयायी होते. असा पुष्कळांचा समज होता. पण अत्रे ही गोष्ट साफ खोटी ठरवतात आणि शास्त्री गांधीजींचे अनुयायी नसून पंजाबच्या लाला लजपतरायांचे अनुयायी होते आणि हे अनुयायीत्व त्यांनी जन्मभर जोपासले असे अत्रे नमूद करतात. ते रेल्वे मंत्री असताना 1956 साली अरियालूर येथे झालेल्या रेल्वे अपघाताची नैतीक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि त्या दिवशी ते सरकारी मोटारीतून घरी न येता बसने घरी आले. 'गृहहीन गृहमंत्री' या लेखाच्या शीर्षकातूनच त्यांच्या गृहहीनतेचे दर्शन घडते. ते पंतप्रधान होण्यापूर्वी गृहमंत्री होते. भारतासारख्या खंडप्राय देशाच्या गृहमंत्रीपदाची जबाबदारी तर त्यांनी यशस्वी पद्धतीने सांभाळलीच पण या कालावधीत देशात ज्या निरनिराळया समस्या निर्माण झाल्या त्यांही त्यांनी यशस्वीरित्या हाताळल्या. देशातील गुंतागुंतीचे अनेक प्रश्न त्यांनी सोडवले. यासाठी प्रसंगी त्यांना झुंजारपणा अवलंबावा लागला. देशातील वेगवेगळया अडचणीच्या प्रसंगी शास्त्रींनी गृहमंत्री म्हणून खंबीरपणे घेतलेले निर्णय व भूमिका यावर अत्रे उदाहरणांसह भाष्य करतात आणि शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वातील खंबीरपणाचे दर्शन घडवतात. तर 'सामान्यातील असामान्य' या लेखात इथून तेथून शास्त्रींच्या साध्या राहणीबद्दल व उच्च विचासरणीबद्दल अत्रे भाष्य करतात. 'देश तसा वेश' हे शास्त्रींबद्दल खरे नव्हते. ते विदेशातही मूळ देशी पद्धतीनेच वावरत असत. त्यांच्या पोषाखात आणि राहणीमानात सर्वत्र साधेपणाच होता. त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस त्यांनी घडवून आणलेल्या ताश्कंद करारासही ते ताश्कंदला अगदी साध्या पोषाखातच गेले. रक्त गोठवणा-या थंडीत ते खादीच्या धोतरामध्ये आणि मोजे न घातलेल्या पायांनीच वावरले. दुर्दैवाने तेथेच त्यांचा अंत झाला. त्यामुळे "खरा राजा हा भोगशून्य स्वामी असतो असे राम गणेश गडक-यांनी एका ठिकाणी म्हटले आहे"[16] ते अत्र्यांना शास्त्रींजींच्याबाबतच खरे वाटते.

या तीनही लेखांमधून अत्र्यांनी उदाहरणांसह शास्त्रीजींचा साधेपणा, राजकारणातील नैतीकता व प्रामाणिकपणा यांचे दर्शन घडवले आहे. अर्थात शास्त्रींची नैतिकता व प्रामाणिकपणावर भाष्य करीत असताना अत्र्यांमधील परखड पत्रकार राजकारणातील लोभी व स्वार्थी प्रवृत्तींवर सडेतोडपणे ताशेरे ओढून त्या त्या व्यक्तींना त्यांची खरी जागा दाखवून देताना दिसतो.

3. **शत्रूंनाही आपले वाटणारे शास्त्रीजी –**

'आयूबने खांदा दिला' व 'सारे जग रडले' या दोन मृत्युलेखांमधून अत्र्यांनी शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व शत्रू राष्ट्रांनादेखील कसे आपले वाटत होते याचे दर्शन घडवले आहे. जो ताश्कंद करार भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून घडवून आणला त्या भारताच्या शत्रूराष्ट्राचे अध्यक्ष अयूबखान आणि रशियाचे अध्यक्ष कोसीजिन या दोघांनीही शास्त्रीजींच्या मृतदेहाला खांदे दिले. शास्त्रींच्या मृत्यूच्या वाटेने 'सारे जग रडले' अर्थात हे घडण्यामागे शत्रूराष्ट्रांच्या अध्यक्षांची केवळ 'मरणांतानि वैराणि' एवढीच भावना नसून शास्त्रींच्या खंबीर राष्ट्राभिमानाचा व शांतता प्रेमाचा तो विजय होता. म्हणूनच शास्त्रीजी भारताच्या शत्रूराष्ट्रांकडूनही गौरविले गेले. त्यांच्या स्वभावात जेवढा कणखरपणा होता तेवढाच नम्रपणाही होता. पाकिस्तानच्या निर्मितीपासून पाकिस्तानने भारतविरोधी सशस्त्र कारवाया जवळजवळ अठरा वर्षे चालूच ठेवल्या. त्या पाकिस्तानी आक्रमणाचा शास्त्रींच्या कारकीर्दीत भारतीय जवानांनी धुव्वा उडवला आणि भारताच्या कणखरपणाचे प्रत्यंतर पाकिस्तानला आले. त्याचप्रमाणे या आक्रमणानंतर शास्त्रींनी घडवून आणलेल्या ताश्कंद करारात त्यांच्या नम्रतेचा अनुभवही पाकिस्तानला आला. शास्त्रीजींएवढा जबरदस्त प्रतिस्पर्धी आणि तेवढाच नम्र शेजारी प्रथमच पाकिस्तानला पहिल्यांदाच भेटला. शास्त्रींच्या कणखरपणाचा, नम्रतेचा आणि संतप्रवृत्तीचा अनुभव याना त्या कारणाने जगाने वेळोवेळी घेतल्याने शास्त्रीजींच्या निधनामुळे त्यांच्यासाठी 'सारे जग रडले' शास्त्रीजींच्या मृत्यूसमयी त्यांच्या नातेवाईकांपैकी कोणी त्यांच्याजवळ नव्हते. मायदेशापासून दूर परदेशी ताश्कंद येथे त्यांचा मृत्यू झाला. म्हणून त्यांचा मृत्यू एकाकी झाला असे म्हणणे अत्र्यांना पटत नाही. कारण 'अवघे विश्वचि माझे घर' ही शास्त्रीजींची संतपूती होती. जागतिक शांततेसाठी त्यांनी शांतता करारावर सही केल्यानंतर कृतार्थ आणि समाधानी मनःस्थितीत झाला. साऱ्या जगातील राष्ट्रप्रमुखांनी त्यांच्या मृत्यूबद्दल हळहळ व्यक्त केली. शत्रू राष्ट्रानांही शास्त्रीजींचे विचार आणि व्यक्तिमत्व भावल्यामुळे शास्त्रींसाठी जगभरातील नेत्यांच्या डोळ्यात पाणी आले.

या दोन लेखांमधून अत्र्यांनी काव्यमय शैलीत शास्त्रींचा शत्रूराष्ट्रांच्या नेत्यांवरही कसा प्रभाव होता हे विशद केले असून त्याद्वारे शास्त्रींचे शांतिदूत म्हणून यथोचित मूल्यमापन केले आहे.

**शास्त्रीजींचे स्वभावचित्रण –**

1. कमालीचा हळुवारपणा व प्रसंगनिष्ठ खंबीरपणाचे चित्रण –

'इतका लहान एवढा महान' मधील बहुतांशी लेखांमधून शास्त्रीजींच्या स्वभावातील नम्रता, हळुवारपणा व प्रसंगनिष्ठ खंबीरपणाचे चित्रण आले आहे. 'वज्रकुसुम शास्त्रीजी' या मृत्युलेखात अत्र्यांनी शास्त्रीजींच्या स्वभाव विशेषांवर विशेष भर दिला असून तुकोबांच्या 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदू ऐसे' या संतवचनाच्या दाखल्यातून ते शास्त्रींच्या स्वभावविशेषांचे विश्लेषण करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हळुवारपणा व आक्रमकपणा, मृदुपणा व कठोरपणा यांचे दर्शन घडवताना अत्रे अनेक दाखले देतात. स्वभावातील हे परस्पर भिन्न प्रवाह शास्त्रीजींच्या स्वभावात एकवटल्याने त्यांचा नम्रपणा हा दुबळेपणातून जन्मला नसून त्यापाठिमागे असणाऱ्या खंबीरपणाचे अत्रे दिग्दर्शन करतात. शास्त्रीजींचे गुरु पुरुषोत्तमदास टंडन शास्त्रीविषयी बोलताना म्हणतात, "There is a rock of toughness behind his humility" "त्यांच्या नम्रतेत खडकाचा कठोरपणा आहे" ते मंत्री झाल्यानंतर लंडनमधल्या एका वृत्तपत्राने त्यांचे वर्णन केले होते की, "There is nothing in the least aggressive about him except his humility" – त्यांच्या नम्रतेखेरीज त्यांच्याजवळ कसलेहि दुसरे आक्रमक सामर्थ्य नाही".[17] अशा प्रकारे देशविदेशातील व्यक्तींनी केलेल्या वक्तव्यांचे दाखले देऊन अत्रे त्यांच्या स्वभावात वज्रासारखी कठोरता व कुसुम कोमलता यांचा समन्वय कसा झाला होता याचे दर्शन घडवतात.

अप्रिय सत्यदेखील ते सौम्यपणे समजावून देत असत. हे त्यांच्या वाणीचे सामर्थ्य आणि सौजन्य होते. त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा व अधिकारपदाचा कधीही गैरवापर तर केला नाहीच पण एखाद्याला जर त्यांनी शिफारसपत्र दिले तर 'हे शिफारसपत्र सरकारी नोकरी मिळविण्यासाठी वापरण्यात येऊ नये. असा शेरा ते मारत असत. इतक्या प्रामाणिकपणे त्यांनी आपल्या अधिकारपदाचा वापर केला. असा हा कठोर खंबीरपणाचा वारसा त्यांना पंजाबचा सिंह लाला लजपतराय यांच्याकडून मिळाला. शास्त्रीजींनी आपल्या वैयक्तिक जीवनात जोपासलेला हा वारसा अत्रे मोठया अभिमानाने सांगतात व त्याचबरोबरीने राजकारणातील निष्क्रिय प्रवृत्तींची खिल्ली उडवतात. शास्त्रींच्या स्वभावातील हळुवारपणात व नम्रपणातच पदोपदी त्यांच्या खंबीरपणाचा आणि मुत्सद्देगिरीचा अनुभव येतो.

म्हणूनच अत्रे त्यांना 'वज्रकुसुम शास्त्रीजी' असे म्हणतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे येथोचित मर्म अत्र्यांना जाणवले असून त्याचे दर्शन या लेखातून त्यांनी घडवले आहे.

**भारतीय विचारसरणी व पूर्ण भारतीय व्यक्तिमत्त्व –**

1. शास्त्रींजीची भारतीय परंपरा –

'शास्त्रींजींची भारतीय परंपरा' या मृत्युलेखात अत्र्यांनी शास्त्रींचे अंतर्बाह्य भारतीय व्यक्तिमत्त्व, भारतीय राहणीमान, भारतीय विचारसरणी व विचारांमधील भारतीय तत्त्वज्ञान यावर भाष्य करुन शास्त्रींचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे भारतीय होते हे स्पष्ट केले आहे. शास्त्रीजीनंतर इंदिरा गांधींनी भारताच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणातही शास्त्रींच्या भारतीय परंपरेचा गौरव केलस. इंदिरा गांधींच्या वक्तव्याच्या अनुषंगाने अत्रे शास्त्रींच्या वागण्यातील, विचारांतील आणि वृत्तीतील भारतीयत्वाचे सोदाहरण दर्शन घडवतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात मार्दव आणि वाणीत आर्जव होते पण त्यांच्या विचारात ठामपणा आणि कृतीत खंबीरपणा होता. त्यांचा साधेपणा आणि त्यांच्या स्वभावातील साधुत्व भारतीय परंपरेतीलच होते. चिंतनशीलता हा भारतीय ऋषींचा गुणविशेष त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असल्याने अत्रे शास्त्रीजींच्या व्यक्तित्वाचे नाते भारतीय ऋषिमुनींशी जोडतात. त्यांचे वक्तृत्त्व फारसे चांगले नव्हते मात्र त्यांचा सारा भर कृतीवर असे. कोणत्याही प्रकारचे दंभ त्यांच्या जीवनात नव्हते. त्यांच्या आयुष्याच्या शेवटी त्यांनी घडवून आणलेल्या ताश्कंद करारातही त्यांनी भारतीय युद्धनीतीच अवलंबली हे मोठया अभिमानाने सांगताना अत्रे म्हणतात, "भारतीय परंपरेत दीर्घकालीन द्वेषाची भावना बसणारी नसून शत्रूलाही मित्र करुन घेण्याच्या वृत्तीलाच तीत मान आहे. शस्त्राचा जरुर तेथे आणि जरुर तेवढा वापर करुन शत्रू पराभूत झाला की, भारतीय परंपरेप्रमाणे शत्रुत्व संपते. शास्त्रीजींनी जो ताश्कंद विजय मिळविला तो त्यांच्या भारतीय परंपरा समृद्ध करण्याचा सर्वात तेजस्वी प्रयत्न होय". [18] शत्रू पराभूत झाल्यानंतरही शत्रूशी शत्रूत्व करणे भारतीय युद्धनीतीस मान्य नाही. शास्त्रीनींही हीच युद्धनीती अवलंबून ताश्कंद करार घडवून आणून पाकिस्तानसारख्या शत्रू राष्ट्रापुढे मैत्रीचा हात केला. हा शास्त्रींच्या मनाचा मोठेपणाच होय. अत्र्यांनी त्यांच्या विचारांच्या, स्वभावाच्या अनुषंगाने भारतीय परंपरा त्यांच्या हाडीमांसी कशा प्रकारे भिनली होती हे या लेखातून व्यक्त केले आहे.

**शास्त्रींच्या शरीरप्रकृतीचे वर्णन –**

1. 'इतका लहान एवढा महान' शीर्षकाची समर्पकता –

'छोटी चीजे बडा काम करती है' आणि 'नन्हे शास्त्रीजी' या दोन मृत्युलेखांमधून अत्र्यांनी शास्त्रींच्या शरीरप्रकृतीचे वर्णन केले आहे. शास्त्रीजींची प्रकृती अतिशय किरकोळ होती. राहणीमानही अगदी साधे असे. खादीचे जाडेभरडे धोतर, खादीचाच सदरा आणि त्यावर खादीचेच जाकिट, डोक्यावर खादीची टोपी, पायात चामडयाचे चढाव अशा साध्या पोशाखातच ते सर्वत्र वावरत असत. त्यामुळे ते एखाद्या क्षुल्लक माणसासारखेच वाटत असत. केवळ शरीरानेच नव्हे तर अनेक बाबतीत ते छोटेच होते. त्यांचा जन्म मोगलसराई या खेडेगावातील एका प्राथमिक शिक्षकाच्या पोटी झाला. ते दीड वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारल्यामुळे त्यांचे बालपण अतिशय गरीबीत गेले. मात्र त्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि जिद्द यांच्या आड त्यांचे छोटेपण त्यांनी येऊ दिले नाही. वयाच्या 17 व्या वर्षापासून त्यांनी स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला तरीदेखील नेहरु – गांधींइतकी देशव्यापी प्रसिद्धीही त्यांना लाभली नव्हती. मात्र स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांच्यावर जबाबदारी आली तेंव्हा या छोटया शरीरप्रकृतीच्या पंतप्रधानाने अगदी अल्पावधीत जी महान मुत्सदेगिरी दाखवली ती सा–या जगाला थक्क करुन सोडणारीच ठरली. त्यांच्या वरकरणी छोटया दिसणा–या पण महान कर्तबगारीविषयी अत्रे म्हणतात, "त्यांच्या छोटेपणाला क्षुद्रत्वाचा स्पर्शही नव्हता. त्यांचे शरीर जेवढे लहान होते, तेवढीच त्यांची बुध्दिमत्ता, तत्त्वनिष्ठा नि राष्ट्रप्रेमाची भावना मोठी होती. बोलण्या – चालण्यात नि वागण्यात ते जेवढे नम्र होते, तेवढेच मनाने ते खंबीर होते. लहानशा पण धारदार, लवचिक पण कणखर अशा तलवारीच्या पात्यामध्ये जे तेजस्वी सामर्थ्य असते तेच शास्त्रीजींमध्ये होते."[19] अत्र्यांच्या शास्त्रींच्या शरीर प्रकृतीविषयीच्या व महान कर्तृत्वाविषयीच्या या वक्तव्यावरुन 'इतका लहान एवढा महान' ह्या शीर्षकाच्या समर्पकतेचे प्रत्यंतर येते. या ग्रंथातील सर्वच लेखांमधून अत्र्यांनी शास्त्रींच्या वामनमूर्तीची व महान कर्तृत्वाची आणि कीर्तिची चर्चा केली आहे. 'कभी कभी छोटी चीजें भी बडा काम करके दिखाती है।" या शास्त्रीजींच्याच उद्‌गाराचा सूतोवाच करुन अत्रे शास्त्रींच्या लहान मूर्तीचा पण कीर्तीचा यथोचित गौरव करतात. 'छोटी चीजे बडा काम करती है।" हे लेखाचे शीर्षकदेखील औचित्यपूर्ण आहे. 'नन्हे शास्त्रीजी' या लेखातही शास्त्रींच्या जीवनचरित्रातील काही मजेदार प्रसंगांच्या अनुषंगाने त्यांचे छोटेपणही किती मोठे होते ते सांगतात. शास्त्रीजी पंतप्रधान असूनही जगाच्या पाठीवर त्यांच्या मालकीची इंचभर जमीन नव्हती की त्यांना स्वतःचे घर नव्हते. इतकेच काय त्यांच्यावर मृत्युसमयी कर्ज होते. त्यांनी एक छोटीशी मोटरगाडी बँकेचे कर्ज काढून घेतली होती आणि दरमहा आपल्या पगारातून ते गाडीच्या कर्जाचे हप्ते देत असत. परंतु शेवटपर्यंत

ते कर्ज फेडू शकले नाहीत. डोक्यावर कर्ज घेऊनच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. इतक्या प्रामाणिकपणे ते राजकारणात वावरले. या लेखात अत्र्यांनी शास्त्रींच्या जीवनातील वेगवेगळे किस्से सांगून 'नन्हे' शास्त्रीजी जरी शारीरिक दृष्टया छोटे असले तरी मानसिक दृष्टया कसे मोठे होते हे सांगितले आहे. जगातील अनेक बुटक्या पण कर्तृत्ववान व्यक्तींचे दाखले देऊन अत्रे शास्त्रींना त्यांच्या पंगतीला बसवतात. या दोन्ही लेखांमधून अत्र्यांनी शास्त्रींच्या शरीरप्रकृतीचे आणि महान कर्तृत्वाचे दर्शन घडवले आहे. शरीर प्रकृतीचे वर्णन करताना ते चित्रमय शैलीत वर्णन करतात व अनेक दाखले देऊन त्यांच्या कर्तृत्वाचे दर्शन घडवतात.

2. <u>राहणीमानातील साधेपणा</u> -

'सामान्यातील असामान्य', 'छोटी चीजे बडा काम करती है', 'नन्हे शास्त्रीजी', 'शास्त्रीजींची भारतीय परंपरा' इत्यादी बव्हंशी लेखांमधून निवेदनाच्या अनुषंगाने अत्र्यांनी शास्त्रीजींच्या साध्या राहणीचे आणि उच्च विचारसरणीचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या आचार विचारांमधील भारतीयत्व व वागण्यातील, पोषाखातील साधेपणा यांची जागोजागी पुनरावृत्ती झाली असली तरी हा पुनरावृत्तीचा दोष पत्करुन सर्वच लेखांमधून शास्त्रीजींचे बाहेरुन दिसणारे छोटे व्यक्तिमत्त्व मानसिक, वैचारिक व कर्तृत्वाच्या पातळीवर किती मोठे होते याचे अनेक दाखले दिले आहेत.

**शास्त्रींचे कौटुंबिक पार्श्वभूमीवरील व्यक्तिमत्त्व –**

1. <u>शास्त्रींच्या आईच्या दृष्टिकोनातुन</u> –

'मेरा लाल नहीं मर सकता ।' या लेखात अत्र्यांनी शास्त्रीजींच्या आई रामदुलारी देवी यांचे दुःख व्यक्त केले आहे. आपल्या पुत्राचा मृतदेह पाहण्याचा दुर्दैवी प्रसंग त्या पंच्याऐंशी वर्षांच्या वृद्ध मातेवर आला. शास्त्रीजींच्या आईला आयुष्यभर दुःखाचे डोंगर पचवावे लागले. शास्त्रीजींच्या जन्मानंतर अवघ्या दीड वर्षात रामदुलारी देवींना वैधव्य आले. अत्यंत बिकट परिस्थितीत त्यांनी 'लाल' चे पालनपोषण केले. दारिद्र्यामुळे 'लाल' ला तिला पुरेसे दूध आणि दोन वेळचे पुरेसे जेवणदेखील देता येत नसे. 'लाल' ला बदलण्यासाठी कपडे नसत. गंगेपलीकडच्या शाळेत जाण्यासाठी होडीचे भाडे देण्यासाठी पैसे नसल्यामुळे 'लाल' कपडे आणि पुस्तके डोक्यावर बांधून गंगेतून पोहत जात असे. कितीतरी हालअपेष्टा सहन करुन तिने 'लाल' ला लहानाचा मोठा केला. त्यात तिचे धैर्य आणि माया तर होतीच पण निःस्वार्थीपणाही होता. 'लाल' जेंव्हा स्वातंत्र्याच्या लढयात भाग घेऊ लागला तेंव्हा तिने धैर्याने त्याला प्रोत्साहन दिले. नेतृत्त्वाची अनेक पदे 'लाल' जेंव्हा भूषवू लागला

तेव्हा तिच्या अभिमानाला मर्यादाच राहिली नाही. अखेर या मातेचा 'लाल' देशाचा पंतप्रधान झाला तरीही ही माता हुरळून गेली नाही की, कसलाही मोह तिला झाला नाही. अनेक वेळा तिने आपल्या पुत्राला 'चिरंजीव हो!', 'शतायु भव ! असे आशीर्वाद दिले असताना तिच्या डोळयादेखत तिचे ते आशीर्वाद खोटे ठरले आणि पुत्राच्या मृत्यूचे दुःख सहन करावे लागले. अत्र्यांनी शास्त्रींच्या मातेची शास्त्रींच्या मृत्युमुळे काय अवस्था झाली असेल याचा करुणरम्य अविष्कार या लेखात घडवला आहे. शास्त्रींच्या आईच्या दृष्टिकोनातून शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन येथे अत्र्यांनी घडवले आहे.

2. <u>शास्त्रींच्या पत्नीच्या दृष्टिकोनातुन</u> –

'मेरे जनम जनम के साथी' या लेखातून शास्त्रीजींच्या पत्नी ललिता गौरींचे दुःख व्यक्त करीत असताना ललितागौरींच्या आक्रोशाचेही वर्णन केले आहे. शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व चारित्र्यसंपन्न होते. ते पत्नीशी आयुष्यभर प्रेमाने आणि निष्ठेने वागले. शास्त्रीजींनी मृत्युपूर्वी काही तास अगोदर ललितागौरींशी दूरध्वनीवर संभाषण करुन, परिषद यशस्वी झाली असून मी दोन दिवस काबूलला थांबून घरी येत आहे असे सांगितले होते. पण काही तासांतच त्यांनी जगाचा निरोप घेतला आणि हे वृत्त जेंव्हा ललिता गौरींच्या कानावर पडले तेंव्हा त्यांच्या दुःखाला पारावार राहिला नाही. अत्र्यांनी अतिशय करुणरम्य भाषेत ललितागौरींच्या दुःखाचे वर्णन करीत असताना त्या अनुषंगाने शास्त्रीजींचे आपल्या पत्नीवरील प्रेम, ललितगौरींचे शास्त्रींवरील प्रेम, निष्ठा तसेच अत्यंत बिकट परिस्थितीत ललितागौरींनी शास्त्रीजींना धैर्याने दिलेली साथ, ललितगौरींचे भावुक व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन घडवले आहे. या लेखातून शास्त्रींच्या कुटुंब वत्सलतेचे दर्शन घडवले असून त्यातूनच शास्त्रींच्या देशसेवेची व त्यागाचीही कल्पना येते. लेखाच्या ओळी ओळीतून शास्त्रींच्या पत्नीचे शास्त्रींवरील प्रेम व्यक्त होते. त्याचप्रमाणे अत्र्यांच्या संवेदनशील मनाची हळहळही जागेजागी व्यक्त झाली आहे. सर्व भारतवासीयांच्या वतीने जणु काही अत्रे ललितागौरींना आश्वासन देतात की, "देवी, तुमच्या पतीचा अंत झाल्यामुळे तुमचे सौभाग्य पुसले गेले असले तरी आपल्या महत्कार्याने त्यांनी आपल्या देशाचे सौभाग्य जे उजळले गेले ते मात्र कधीही पुसले जाणार नाही.[20] अत्र्यांच्या या वक्तव्यावरुन शास्त्रींचे व्यक्तिमत्त्व अत्र्यांच्या मनाला किती भावले असावे याची कल्पना येते.

3. <u>शास्त्रींच्या नातवंडाच्या दृष्टिकोनातुन</u> –

'बाबूजी सो रहे है' या लेखातून अत्र्यांनी शास्त्रीजींच्या नातवंडाच्या मनातील शास्त्रींविषयीची अल्लडपणाची भावना व्यक्त केली आहे. शास्त्रींची नातवंडे आपल्या आजोबांना बाबूजी असे म्हणत.

बाबूजी आपल्या नातवंडांबरोबर व्हरांडयात पत्ते खेळत असत. नेहमीप्रमाणे ते व्हरांडयात पत्ते खेळायला आले नाहीत तेंव्हा त्यांची नातवंडे आपसात 'बाबूजी सो रहे है।' असे कुजबुजू लागली. त्यांच्या नावंडाचे हे उद्‌गार अत्र्यांच्या अंतःकरणाला पीळ पाडतात. नेहरुंना जशी लहान मुले आवडत तशीच शास्त्रीनांही लहान मुले आवडत असत. ते लहान मुलांमध्ये रमून जात. त्यांच्याशी खेळत. हे नेहरु आणि शास्त्रीजी यांच्या स्वभावातील साम्य सांगत असताना अत्रे नेहरु व शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वाची आणि परिस्थितीशी तुलना करुन नेहरुंचे बालपण लाडाकोडात, ऐश्वर्यात गेले. उलट शास्त्रींचे बालपण अत्यंत बिकट परिस्थितीत व कष्टात गेले हेही नमूद करतात. इतर ब-याच बाबतीत नेहरु आणि शास्त्री यांच्या जीवनात परस्पर विसंगती असली तरी "लहान मुलांवर पराकाष्ठेचे प्रेम हे नेहरु आणि शास्त्रीजी ह्यांच्या स्वभावातले एकच विलक्षण साम्य होते."[21] असे अत्र्यांना वाटते. त्या अनुषंगाने अत्र्यांनी शास्त्रींच्या छोटया शरीर प्रकृतीचे व बालमनोवृत्तीचे काही किस्से सांगून त्यांच्या मनामधील लहान मुलांविषयीचे प्रेम, जिव्हाळा व स्नेहभाव व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या स्वभावातील नम्रतेचेही प्रत्यंतर या लेखात येते.

'मेरा लाल नही मर सकता', 'मेरे जनम जनम के साथी', आणि 'बाबूजी सो रहे है।" या तीन लेखांमधून अत्र्यांनी शास्त्रीजींची माता, पत्नी व नातवंडांच्या मनातील शास्त्रीविषयींचा कौटुंबिक जिव्हाळा, स्नेहभाव व शास्त्रींचे कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन घडवले आहे. या लेखनात जागोजागी अत्र्यांच्या मनातील संवेदनशीलतेचे प्रत्यंतर येते. व शास्त्रींच्या कुटुंबियांच्या मनातील शोक व्यक्त करीत असताना स्वाभाविकपणे अत्र्यांच्या मनातील हळहळही व्यक्त होते. देशाच्या पातळीवर तर शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व महान होतेच होते पण त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीवरही त्यांचे व्यक्तिमत्त्व त्याहूनही महान होते. शास्त्रीजींच्या मृत्युमुळे देशाच्या दृष्टीने झालेले नुकसान एखादी तशीच व्यक्ती निर्माण झाली ती भरुन येण्यासारखे आहे. पण त्यांच्या कुटुंबावर जी आपत्ती कोसळली ती मात्र कदापी भरुन येणार नाही अशी हळहळ या लेखनात अत्रे व्यक्त करतात. एकंदरीत शास्त्रींचे कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व या तीनही लेखांमधून अत्र्यांनी अतिशय समर्पकपणे व भावपूर्णतेने व्यक्त केले आहे.

**शास्त्रींच्या 'मृत्युप्रसंगाचे व अस्थिविसर्जन' प्रसंगाचे कारुण्यापूर्ण चित्रण –**

1. <u>मृत्युप्रसंगाचे चित्रण –</u>

अत्रे मृत्युलेख लिहित असताना विशेषतः मृत व्यक्तीच्या मृत्युप्रसंगाचे वर्णन करीत नाहीत. मात्र 'ती काळरात्र' या लेखात अत्र्यांनी शास्त्रींच्या आकस्मिक मृत्यूचे वर्णन तपशीलवार केले आहे. दि. 10 जाने. 1966 रोजी ताश्कंद करारावर सही होईपर्यंत शास्त्रींची प्रकृती उत्तम होती. रात्री झोपण्यापूर्वी त्यांनी आपल्या घरी दिल्लीला फोनही केला आणि रात्री साडेबाराला ते झोपी गेले. मात्र तासाभ–यातच त्यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना श्वासोच्छ्वासाचा त्रास सुरु झाला. चेहरा पांढराफटक पडला. नाडीची गती जलद होऊन हृदयाचे ठोके मंदावले. डॉक्टरांनी तशा अवस्थेत शक्य तेवढे उपचार त्यांच्यावर केले पण अवघ्या तीन मिनिटात त्यांची शुद्ध गेली. हृदयाचे ठोके आणि श्वासोच्छ्वासही बंद पडला. रात्री एक वाजून बत्तीस मिनिटांनी त्यांच्या देहावर मृत्यूची कळा पसरली. हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे त्यांना मृत्यू आला असा लेखी अभिप्राय डॉक्टरांनी दिला. अशा प्रकारे शास्त्रीजींच्या मृत्युप्रसंगाचे तपशीलवार वर्णन अत्रे करतात. एरव्ही मृत्युलेख लिहिताना मृत्युप्रसंगास फारसे महत्त्व न देता व्यक्तीच्या कार्याच्या व तिच्याशी असणा–या जिव्हाळयाच्या अनुषंगाने मृत्युलेख फुलवणारे अत्रे येथे मात्र मृत्युप्रसंगाचे तपशीलवार वर्णन करतात. याचे कारण शास्त्रींचा मृत्यू अतिशय अकस्मात घडून आल्याने मृत्युप्रसंगाबद्दल साहजिकच वाचकांच्या मनात जिज्ञासा असणे स्वाभाविक आहे. ह्या जिज्ञासापूर्तीसाठीच ते शास्त्रींच्या मृत्युप्रसंगाचे वर्णन तपशीलवार करतात. त्याचप्रमाणे सोव्हिएत रशियाने शास्त्रीजींना वाहिलेली आदरांजलीही अत्र्यांनी या लेखात दिली आहे. शास्त्रीजींची शवपेटी ताश्कंदमधून भारतात आणली गेल्याच्या प्रसंगाचेही ते चित्रमय पद्धतीने वर्णन करतात. येथेसर्वत्र जरी तपशीलपूर्णता असली तरीदेखील लेखास कोणत्याही प्रकारची रुक्षता येत नाही किंवा लेखाचे स्वरुप केवळ जंत्रीवजादेखील होत नाही.

2. <u>अस्थिविसर्जन प्रसंगाचे चित्रण</u> –

'अस्थिविसर्जन' या लेखात शास्त्रींच्या 'अस्थिविसर्जन' प्रसंगाच्या निमित्ताने अत्र्यांनी मृत्यूचे तत्त्वज्ञान व शास्त्रींचे स्मरणीय कार्य यावर भाष्य केले आहे. हे भाष्य करीत असताना अत्र्यांच्या चिंतनशीलतेचे प्रत्यंतर येते व भाषा काव्यमय बनते. अलंकारिक शैलीत शास्त्रींच्या अस्थिविसर्जन प्रसंगाचे वर्णन लेखात सर्वत्र आले आहे. शास्त्रींसारखा महामानव हिरावून नेणा–या मृत्यूला ते क्रूर, कपटी अशी दूषणे देतात. त्याचप्रमाणे मृत्यूविषयीचे तत्त्वज्ञान सांगत असताना अत्र्यांमधील भावनाशील कवीचे प्रत्यंतर येते. "आत्म्याचा पक्षी कधीच अनंतात उडून गेला होता

आणि रिकामा पडलेला कायेचा पिंजराहि भस्मसात् झाला होता. काळाने पंचप्राणाचा घास घेतला होता आणि रिती झालेली शरीराची पत्रावळही चितेने भक्षिली होती. मृत्यूने जीवनरस शोषून घेतला होता आणि शिल्लक राहिलेला अचेतन कुडीचा शुष्क चोथाही जळून खाक झाला होता. आणि आता त्या रक्षा नि अस्थीही वेगवेगळया तीर्थांमध्ये विसर्जित होणार होत्या, कणाकणांनी विरुन जाणार होत्या."[22] अशा काव्यमय व कारुण्याने ओथंबलेल्या शब्दात ते या प्रसंगाचे वर्णन करीत असताना साहजिकच त्यातून जीवन विषयक तत्त्वज्ञानही व्यक्त होते. त्यांना जीवनानुभावाची प्रगल्भ जाणीव असल्याचेही या वर्णनातून अनुभवास येते. निवेदनात एक प्रकारचा धीरगंभीरपणा असून करुणरम्य शैलीत 'अस्थिविसर्जन' प्रसंगाचे वर्णन करताना लेखनात संवेदनशीलता तर येतेच पण त्याबरोबरीने अत्र्यांचा जीवनविषयक प्रगल्भ दृष्टिकोनही व्यक्त होतो. अत्र्यांच्या मनातील मृत्यूविषयक जाणीवांचे चित्रण येते. त्यासंबधींच्या अत्र्यांच्या चिंतनशीलतेचे प्रत्यंतर लेखाच्या शब्दाशब्दातून जाणवत राहते.

'ती काळरात्र' आणि 'अस्थिविसर्जन' या दोन लेखांमधून अत्र्यांनी शास्त्रींच्या मृत्युप्रसंगाचे व अस्थिविसर्जन प्रसंगाचे करुणरम्य चित्रण केले आहे.

एकंदरीत 'इतका लहान एवढा महान' या लालबहादूर शास्त्रींवरील मृत्युलेख संग्रहातील अठरा मृत्युलेखांमधून शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर अत्र्यांनी भाष्य केले आहे. या मृत्युलेखांमधून शास्त्रींचे उद्‌बोधक चरित्रच ते वाचकांसमोर ठेवतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील नम्रता आणि तितकाच कणखरपणा यांचे दर्शन घडवत असताना त्यांनी अल्पावधीत दाखवलेली कर्तृत्वाची चमक अत्र्यांच्या गुणग्राहक व्यक्तिमत्त्वाला आकर्षित करुन घेते. शास्त्रीजींचे यशस्वी राजकारण, राजकीय नैतिकता व प्रामाणिकपणा, त्यांच्या स्वभावातील हळुवारपणा, कोमलपणा आणि खंबीरपणा, त्यांचे अंतर्बाह्य भारतीय व्यक्तिमत्त्व आणि भारतीय विचारसरणी, राहणीमानातील साधेपणा, लहान वामनमूर्ती पण महान किर्ती, व कर्तृत्त्व, त्यांचे कौटुंबिक पार्श्वभूमीवरील त्यांच्या आईच्या, पत्नीच्या आणि नातवंडांच्या दृष्टिकोनातून व्यक्तिमत्त्व या सा--याचा विवेचक शोध अत्र्यांनी या लेखनात घेतला असून पदोपदी अत्र्यांमधील गुणग्राहक, व्यक्तिपूजकतेचे दर्शन घडते.

'हुंदके' व 'समाधीवरील अश्रू' या संग्रहामधील मृत्युलेखांच्या तुलनेत 'दलितांचे बाबा', 'सूर्यास्त', 'इतका लहान एवढा महान' मधील मृत्युलेखांचा विचार करताना असे आढळते की, 'हुंदके' मधील मृत्युलेख चरित्रवर्णनपर, माहितीवर कथात्मक स्वरुपाचे असून ह्या लेखनात घटनाप्राचुर्य व अनुभव कथनास विशेष भर आहे. जीवनदर्शन, व्यक्तिमत्त्वदर्शन, मूल्यमापन या

दृष्टीने हे लेखन यथोचित झाले आहे. व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म चिंतन, अत्र्यांचा जनसंपर्क, शीर्षकांची समर्पकता, भाषेतील प्रवाहीपणा आणि चित्रमयता, व्यक्तीचे व्यक्ती म्हणून वेगळेपणा, तिचे कार्यक्षेत्र, समाजावरील त्या व्यक्तीचा प्रभाव, वैयक्तिक स्नेहभाव ह्या अंगाने हे लेखन झाले आहे. विस्ताराच्या दृष्टीने हे मृत्युलेख आटोपशीर आहेत. मात्र 'समाधीवरील अश्रू' मधील मृत्युलेखांचे स्वरुप ललित स्वरुपाच्या दीर्घ निबंधात्मक आहे. ह्या लेखनामधूनही व्यक्तित्त्व दर्शना बरोबरच अत्र्यांची वैचारिकता, चिंतनशीलता यांचे प्रत्यंतर येते. तसेच मृत्युलेखांना असणारे भावसौंदर्य, व्यक्तीविषयक अलोट प्रेम, जिव्हाळा याचबरोबरीने व्यक्तीजीवनाचे यथोचित मूल्यमापन करण्याची अत्र्यांची शैली ह्या संग्रहातील लेखांमध्येही दिसून येते. तुलनेत 'आषाढस्य प्रथम दिवसे' या संग्रहातील लेखांचे स्वरुप स्मृतिलेखांचे असल्यामुळे त्यांचे स्वरुप मृत्युलेखांहून निराळे आहे. हे सर्वच लेखन जरी अग्रलेखांच्या स्वरुपातील असले तरीदेखील मृत्युलेखांमधून घडणा–या व्यक्तिदर्शनास असणारी भाव विवशतेची, जिव्हाळयाची जोड स्मृतिलेखांमध्ये येऊ शकत नाही. कारण मृत्युलेखांचे लेखन तत्कालीन भावनातिरेकाच्या झपाटलेपणातून होत असते व स्मृतिलेखात व्यक्ती निवर्तल्यावर विशिष्ट कालावधी लोटल्यानंतर त्या व्यक्तीच्या कार्याचे, विचारांचे, व्यक्तिमत्त्वाचे स्मरण करण्याच्या भूमिकेतून स्मृतिलेख लेखन झाल्याने त्यात लेखकाच्या संशोधक वृत्तीस विशेष वाव असतो. त्यामुळे ह्या लेखनात भावनिकतेपेक्षा चिंतनशीलता, काव्यमयता, आत्मीयता व उदात्ततेवर विशेष भर आहे.

अत्र्यांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या, अभ्यासलेल्या, व्यक्तींच्या विविध स्मृतिदिनांच्या निनित्ताने हे लेखन झाले आहे. त्याचप्रमाणे काही ऐतिहासिक व्यक्तींच्या स्मृतिदिनानिमित्ताने त्यांच्या ऐतिहासिक कार्याच्या अनुषंगाने अत्र्यांनी काही ऐतिहासिक व्यक्तींवरही स्मृतिलेख लिहिले आहेत. आध्यात्मिक क्षेत्रातील काही व्यक्तींवरील स्मृतिलेखांचा समावेश या ग्रंथात आहे. अत्र्यांच्या व्यासंगी, गुणग्राहक, व्यक्तिपूजक, परंपरापूजक, इतिहासाकडे डोळसपणे पाहण्याचा दृष्टिकोन, आध्यात्मिकता यांचे दर्शन या ग्रंथातील लेखनात घडते. 'दलितांचे बाबा' या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याच्या अनुषंगाने अत्र्यांनी लिहिलेल्या सहव्वीस लेखांचा समावेश आहे. मात्र त्यापैकी चार मृत्युलेख आहेत व तीन स्मृतिलेख आहेत. इतर सर्व लेखांमधून बाबासाहेबांचे दलितोद्धाराचे कार्य आणि त्यांचे वैचारिक व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन घडवले आहे. 'सुर्यास्त' मधील सतरा लेखांचे स्वरुप भावकाव्यात्मक मृत्युलेखांचे आहे आणि 'इतका लहानएवढा महान' मधील अठरा मृत्युलेखांचे स्वरुप

चरित्रपर आहे. 'दलितांचे बाबा' या ग्रंथात पदोपदी येणारा पुनरावृत्तीचा दोष 'इतका लहान एवढा महान' या ग्रंथातही आला आहे. याचे कारण वृत्तपत्रासाठी म्हणून लिहिल्या गेलेल्या या लेखांवर ग्रंथरुपाने संपादित करीत असताना जे संस्कार व्हावयास हवे होते ते झालेले नाहीत. त्यामुळेच या लेखनात पुनरावृत्तीचा दोष जाणवतो. तरीदेखील ह्या लेखनातून त्या त्या व्यक्तींचा जीवनव्यापी आढावा घेतल्याने व्यक्ती समजून घेण्याच्या दृष्टीने हे लेखन महत्त्वपूर्ण ठरते.

वरील विवेचना आधारे आपणास खालील निष्कर्ष काढता येतील.

1. 'दलितांचे बाबा' या ग्रंथातील लेखांमधून आंबेडकरांचे व्यक्तिदर्शन व वैचारिक विकसन यांचा एकत्रित प्रत्यय येतो.

2. 'सूर्यास्त' चे लेखन स्मरणीय भावकाव्यात्मक झाले असून त्यातून अत्र्यांचा काव्यमय दृष्टिकोन व्यक्त होतो.

3. 'सूर्यास्त' मधील बव्हंशी मृत्युलेखांच्या शीर्षकांमधून नेहरुंच्या जीवनविषयक कलात्मक दृष्टिकोनाचे प्रत्यंतर येते.

4. नेहरुंविषयक भावनिकता, काव्यात्मता व चिंतनशीलता यांचे एकत्रित प्रत्यंतर 'सूर्यास्त' मधील लेखनात झाले आहे.

5. 'सूर्यास्त' हा अत्र्यांचा भावोत्कट मनोवृत्तीचा अविष्कार असून भावनांच्या आर्तवलयांचा अनुभव या लेखनात पदोपदी जाणवतो.

6. 'इतका लहान एवढा महान' मधील लेखनात अत्र्यांची वास्तवाभिमुखता, अनुभवाचा खरेपणा, स्पष्टवक्तेपणा, व्यक्तिमत्त्वा विषयीचा आदर, व्यक्तिपूजका यांचे प्रत्यंतर येते.

7. अत्र्यांच्या बहिर्मुखतेचे व गुणग्राहकतेचे दर्शन या लेखनात जागोजागी घडते.

8. आंतरिक जिव्हाळयाच्या भावनेतून मृत्युलेखांचे लेखन झाल्यामुळे त्यात करुणरम्य सौंदर्याचे प्रत्यंतर येते. भाषेत स्वाभाविकपणे करुणरम्य सुभाषितांची निर्मिती होते.

9. या लेखनात माहितीच्या तपशीलांबरोबर काळाचे संदर्भही येतात.

10. अत्र्यांच्या चिंतनशीलतेचे प्रत्यंतर ह्या लेखनातून जाणवते.

*****

## तळटीपा

1. एस. एस. भोसले : प्र. के. अत्रे साहित्य आणि समीक्षा' : प्रथमावृत्ती : अजब कोल्हापूर : 1976 : पृष्ठ 320.
2. प्र. के. अत्रे : 'दलितांचे बाबा' : सहावी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1995 : पृष्ठ 34.
3. तत्रैव : पृष्ठ 37.
4. एस. एस. भोसले : 'प्र. के. अत्रे साहित्य आणि समीक्षा' प्रथमावृत्ती : अजब, कोल्हापूर : 1976 : पृष्ठ 336.
5. प्र. के. अत्रे : 'सूर्यास्त' तिसरी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1989 पृष्ठ 41.
6. तत्रैव : पृष्ठ 50.
7. तत्रैव : पृष्ठ 76.
8. तत्रैव : पृष्ठ 19.
9. तत्रैव : पृष्ठ 61, 62.
10. तत्रैव : पृष्ठ 63.
11. तत्रैव : पृष्ठ 83, 84, 85.
12. ल. रा. नसिराबादकर : 'आचार्य अत्रे : साहित्य दर्शन' प्रथमावृत्ती : फडके कोल्हापूर : 1976 पृष्ठ 247.
13. प्र. के. अत्रे : 'इतका लहान एवढा महान' प्रथमावृत्ती : परचुरे मुंबई : 1967 : पृष्ठ : 3.
14. तत्रैव : पृष्ठ 5.
15. तत्रैव : पृष्ठ 87.
16. तत्रैव : पृष्ठ 84.
17. तत्रैव : पृष्ठ 71.
18. तत्रैव : पृष्ठ 79.
19. तत्रैव : पृष्ठ 43.
20. तत्रैव : पृष्ठ 22.
21. तत्रैव : पृष्ठ 27.
22. तत्रैव : पृष्ठ 92.

***